
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क



''मेरी झाँसी नहीं दूँगी''

• पुणे • वर्ष १४ वे • अंक ३ रा • ऑक्टोबर-डिसेंबर २०१८ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-



Pitambari®


SOLARCARE

Let Sun do the work!

# Go Green with Free Energy

## Why Pitambari Solar Care?

Pitambari Solar Care Division's emphasis on Quality & Excellence has allowed us to offer Customized Solutions to customers ensuring savings in electricity bills & higher return on investment.




### Key components of our unique:

**Project Management**




- Data Collection & Analysis
- System Analysis
- Feasibility Study
- Shadow Analysis
- Design & Engineering
- Implementation Plan
- Continual Evaluation

**Experienced Team**



- Design & Engineering
- Project Management
- Quality Control
- Govt. Liaisoning

Mr. Shamindra Kulkarni: 9619850335, Mr. Chaitanya Palsule: 9870403928

**Pitambari Products Pvt.Ltd.**

Thane: 022-6703 5555, CIN: U24239MH1989PTC051314. solar@pitambari.com | www.pitambari.com/solarcare

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ ॐ स्थापना १९९१

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

वर्ष १४ वे | ऑक्टोबर-डिसेंबर २०१८ | अंक ३ रा

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
मोबा. : ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर
मोबा. : ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर
मोबा. : ९८२०४ १७९८१

संस्था नोंदणी क्र. महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६

मुख्य संपादक : श्री. श्रीगजानन गुर्जर
पुणे ९९७०१ ७४८१८ / ८८०६३ ९५८८० (WhatsApp)

शहर प्रतिनिधी

- श्री. प्रसाद पंडीत, मुंबई, ९८६९१ ५५२१५
- श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३
- श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१ ६३६५९
- श्री. मनिष नवाथे, नागपूर ९८५०३ ३१४६० *
- सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९ ७३६७९
- श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११० ६३०३०
- श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५ ४९०८५
- श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ००५८७
- श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१
- श्री. श्रीधर पंतवैद्य, पुणे, ७७०९० ०८३६९
- श्री. निळकंठ मुळये, बडोदा, ९८२५६ ८५९७३
- श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९ ९५८९२
- श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६९७
- श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदूर्ग, ९४२३८ ८०१३८
- श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२ ०५६९०
- सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५

**ऑफिस संपर्क :** ०२०-२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक - श्री. श्रीगजानन गुर्जर

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी आता रु. 300/-, रु. 500/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षेसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे-30 च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे). शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 05521011004008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयांतच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

**मुख्य संपादक : श्रीगजानन गुर्जर**

### जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ५००/- | रु. २०००/- |
| अर्धा | रु. १०००/- | रु. ४०००/- |
| पूर्ण | रु. २०००/- | रु. ८०००/- |
| शुभेच्छा | रु. ५००/- | रु. २०००/- |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३०००/- | रु. १२०००/- |
| पृष्ठदान | रु. २००/- | - |

**नियतकालिकाचे नाव :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०
**मुख्य संपादक :** श्री. श्रीगजानन गुर्जर
**मुद्रक :** श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# अनुक्रमणिका


- ❑ संपादकीय ३
- ❑ कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास ४
- ❑ अरेच्या, मी लेखक झालो ६
- ❑ पेढी ७
- ❑ सफर स्वप्नभूमीची अर्थातच लंडन आणि स्कॉटलंडची ८
- ❑ ॲलोपॅथिक मेडिकल सायन्सची वास्तविकता ११
- ❑ मंत्रोच्चारातील शुद्ध अक्षर उच्चाराचे प्राचीन शास्त्र १४
- ❑ दिवाळीचं बदलतं स्वरुप १५
- ❑ स्वप्नसुंदरीस १६
- ❑ पद्मनाभस्वामी मंदिर १७
- ❑ समुद्र किनाऱ्याची स्वच्छता १८
- ❑ अनोखा सारस पक्षी २०
- ❑ युद्धस्य कथा रम्याः – श्रीकृष्णार्जून संवाद २०
- ❑ संस्थावृत्त –❑ कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे २१
  - ❑ कऱ्हाडे ब्राह्मण सेवा संघ, डोंबिवली २१
  - ❑ कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त २२
  - ❑ क. ब्रा. सेवा संघ, डोंबिवली – वर्षा सहलीचा अहवाल २३
  - ❑ क. ब्रा. सेवा संघ, डोंबिवली – कांदे नवमी २३
  - ❑ क. ब्रा. सेवा संघ, डोंबिवली – बालक पालक मेळावा २०१८ २४
  - ❑ क. ब्रा. संघ, मुंबई – सहल २५
  - ❑ क. ब्रा. संघ, सातारा – वर्धापनदिन २५
- ❑ खजूर २६
- ❑ डिंकाचे लाडू २६
- ❑ The Karhaadaa Braahman! २७
- ❑ मंदार मनोहर तांबे २८
- ❑ डॉ. श्रीकृष्ण जोशी – अल्प परिचय २९
- ❑ मनुष्य स्वभावाचे काही नमुने ३०
- ❑ मेरी झाँशी नही दूँगी ३०
- ❑ क्षण जगलेले ३१
- ❑ आषाढ मासी ३१
- ❑ नरो वा कुंजरो वा ३१
- ❑ गोत्र म्हणजे काय ३२
- ❑ आजीचे नातीला पत्ररूपाने आशीर्वाद ३३
- ❑ कृतज्ञतेचा निर्देशांक ३४


संपर्क


**संपादक मंडळ**

श्रीगजानन गुर्जर
मुख्य संपादक
मो. ९९७०१ ७४८१८

गोपाळ भाटवडेकर
उपसंपादक
मो. ९८५०९ ७९७०६

सचिन ताटके
तंत्रज्ञ
मो. ९८६७१ ९२३१०

प्रदीप हळबे
सल्लागार
मो. ९८३३१ ६३६५९

श्रीधर पंतवैद्य
सल्लागार
मो. ७७०९० ०८३६९

गणेश गुर्जर
प्रकाशक
मो. ८१४९९ ०७७८९


शुभ दीपावली.

सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – मुख्य संपादक

# संपादकीय

नमस्कार,

'शारदीय नवरात्र' उत्सवास चैतन्ययुक्त भक्तीभावाने प्रारंभ झाला आहे. साडेतीन मुहुर्तांपैकी एक असणारा 'विजयादशमी' अर्थात 'दसरा' या सणाच्या मुहुर्तावर 'संपर्क' त्रैमासिक ऑक्टोबर-डिसेंबर २०१८ चा अंक प्रकाशित होत आहे. 'विजयादशमी' अर्थात 'दसरा' सणाच्या आमच्या सर्व वाचकांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा!!


जुलै २०१८ मध्ये भारतीय टपाल खात्याने त्यांच्या 'वितरण' विषयक नियमात काही बदल केले आहेत. त्यातील आपल्या दृष्टीने महत्त्वाचा म्हणजे, यापुढे 'संपर्क' अंकावर फक्त सभासदांचे 'नाव व पत्ता' इतकाच उल्लेख वितरणासाठी करता येईल. पूर्वी आपण सभासदांचा रजिस्ट्रेशन नंबर/पावती क्रमांक आणि वर्गणीची मुदत संपण्याचा कालावधी म्हणजे महिना/वर्ष या संबंधी माहितीचा उल्लेख, सभासदांच्या नावांवरील ओळीत करत होतो. आता यापुढे टपाल खात्याच्या नवीन नियमाप्रमाणे तसे करता येणार नाही. त्यामुळे प्रत्येक कऱ्हाडे ब्राह्मण संघाची आणि विशेषतः शहर प्रतिनिधींची जबाबदारी वाढली आहे. प्रत्येक शहर प्रतिनिधींना आपल्या संघातील 'संपर्क' वर्गणीदारांची यादी, वर्गणीची मुदत संपण्याच्या तारखेसह ठेवणे आवश्यक आहे. काही सन्माननीय अपवाद वगळता, शहर प्रतिनिधींचा आतापर्यंतचा 'संपर्क' वितरणातील सहभाग कधीही जाणवलेला नाही. Their presence was never felt. परंतु यापुढे या परिस्थितीत सुधारणा होणे आवश्यक आहे. शहर प्रतिनिधींनी सभासदांची यादी ठेवण्या व्यतिरिक्त; वर्गणीची मुदत संपणाऱ्या सन्माननीय सभासदांना स्मरणपत्र पाठवून त्यांचे सभासदत्व कायम राखण्यात मदत करणे सुद्धा अपेक्षित आहे. आम्ही आमच्या स्तरावर सर्व सभासदांची अद्ययावत माहिती ठेवत आहोतच. तसेच सर्व संघांना आणि शहर प्रतिनिधींना सुद्धा ती उपलब्ध आहे. मात्र आता 'टपाल' खात्याने त्यांच्या नियमात केलेल्या बदलाची सर्वांनी योग्य ती नोंद घ्यावी आणि सहकार्य करावे.

'संपर्क' त्रैमासिकासाठी, लेख, प्रवासवर्णन, संस्थावृत्त, कविता, रेसिपी वगैरे साहित्य आमच्याकडे पाठविण्याविषयी पुनःश्च सर्वांना आवाहन करत आहोत. शहर प्रतिनिधींनी याबाबत आपआपल्या संघात साजरा होणाऱ्या प्रत्येक समारंभातून जनजागृती करावी, असे सुचवावेसे वाटते.

आश्विन-कार्तिक महिन्याच्या सीमेवर, नोव्हेंबरच्या सुरवातीला आगमन होत असलेल्या 'दीपावली' सणासाठी, आमच्या सर्व सन्माननीय सभासदांना, जाहिरातदारांना आणि हितचिंतकांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा. ही दिवाळी सर्वांना खूप खूप आनंदाची, भरभराटीची, आरोग्यदायी आणि मांगल्याची जावो.



शुभ दीपावली.



श्रीगजानन गुर्जर

मुख्य संपादक

# कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास

कऱ्हाडे हे प्रादेशिक नाव आहे. ते करहाटक प्रांत व त्यातील करहाटक हे शहर यावरून पडलेले आहे. तसेच दक्षिणी ब्राह्मणांतला तो एक पोटभेद आहे. कऱ्हाडे ब्राह्मण हे कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, गोवा आदी भागांत सर्वत्र पसरलेले आहेत. कऱ्हाड्यांतील ५४५ उपनामांपैकी २०२ उपनामे गावांच्या नावांपुढे 'कर' असा प्रत्यय लावून बनवलेली आहेत. त्यांची एकूण २४ गोत्रे आहेत. सर्व कऱ्हाडे ब्राह्मण एकेदी (ऋग्वेदी), एक सूत्री (आश्वलायन सूत्री) व एक शाखी (शाकल शाखी आहेत). बहुतेक कऱ्हाडे स्मार्त असून अद्वैत मतानुयायी आहेत. काही कऱ्हाडे वैष्णवही आहेत, पण ते त्या मानाने फारच थोडे आहेत. बहुतेक कऱ्हाड्यांची देवता कोल्हापूरची महालक्ष्मीच आहे. तथापि, गोमन्तकातील कऱ्हाड्यांच्या कुलदेवता शांतादुर्गा, म्हाळसा, महालक्ष्मी आदी आहेत. अनंत चतुर्दशीची पूजा, ललिता पंचमी, दुर्गाष्टमी व नवरात्रात सप्तशतीचे पाठ कऱ्हाडे ज्ञातीत विशेषत्वाने आढळतात.

**करहाटक प्रांतातून कोकणात आगमन :** आपल्यातील आजवर प्रसिद्ध झालेले निरनिराळ्या घराण्यांचे इतिहास पाहिले तर हे चटकन लक्षात येते की, करहाटक किंवा कऱ्हाड प्रांतातून ही ब्राह्मण घराणी प्रथम कोकणात गेली व तिथूनच नंतर ती अन्यत्र गेली. असे दिसते की, दक्षिण कोकणची भूमी वसाहतीस योग्य झाल्यावर, शिलाहार राजे यांच्या प्रोत्साहनमुळे तिथे वसाहत करण्याकरिता निरनिराळ्या प्रदेशांतून लोक आले व स्थायिक झाले. त्यापैकी आपली कऱ्हाडे ज्ञाती ही एक होय.

उदाहरणार्थ मावळकर (सरदेसाई, लळित, गोविळकर) घराण्यांचे मूळ पुरुष नृसिंहभट्ट सत्यवादी हे मूळचे पैठणचे. ते इ.स. ११५० चे सुमारास संगमेश्वर तालुक्यातील मावळंगे येथील जागृत नृसिंहाची उपासना करण्यासाठी येथे आले व त्यांनी कठोर तपश्चर्या केली. त्यायोगे त्यांना पुत्रलाभ झाला. त्यांच्या नातवाला शिलाहार राजे विजयार्क यांच्याकडून इ.स. ११८५ च्या सुमारास संगमेश्वर गाव इनाम मिळाले.

इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात की, नृसिंहभट्ट यांचे कऱ्हाड घराणे हे कोकणातील पहिले व महत्त्वाचे होय. करहाटक ब्राह्मणांचे राजापूर-संगमेश्वर टापूत आगमन याचे बरोबर झाले.

तसेच, मराठवाड्यातील आंबेजोगाईतील खेर घराणे आले, ते कोकणात नेवरे येथे स्थायिक झाले.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील 'आटोली' गावाहून इ. स. च्या अकराव्या शतकाच्या सुमारास आठल्ये आले व ते कोकणात देवळे महालाचे 'धर्माधिकारी' बनले.

गुलबर्ग्याहून इ. स. १४२५ मध्ये पंडित (सरदेशपांडे, जमिनीस, कुलकर्णी) देवळे, लांजे, हरचेरी, हातखंबा व पावस महालाच्या कुलकर्णी वतनाच्या सनदा घेऊन कोकणात आले. ओरपे (सरपोतदार, कारखानीस, सबनीस आदी) ही घराणी करहाटक प्रांतातून कोकणात आली.

गुजरातेतून गुर्जर आले व ते राजापूरला स्थायिक झाले. कदंबराजांनी (कमलादेवी व माधव मंत्री यांनी) कित्येक ब्राह्मण घराणी गोमंतकात नेली व तिथे त्यांना इनामे दिली. त्यामुळे ते गोमंतकातच स्थायिक झाले. पुढे मुसलमान व पोर्तुगीज यांच्या आक्रमणामुळे त्यापैकी काही घराणी निर्वासित झाली आणि रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागात स्थायिक झाली. ठाकूरदेसाई, प्रभूदेसाई, अधिकारी देसाई या घराण्यांची कुलदैवते गोमंतकातील आहेत; यावरून वरील विधानाला पुष्टीच मिळते. गोमंतकात अद्यापही कऱ्हाडे ब्राह्मणांची २०० कुटुंबे आहेत. म्हार्दोळ व शांतादुर्गा देवस्थानचे महाजन पाध्ये हे मूळचे पाध्ये होत. सध्या कऱ्हाडे हे सर्व भारतभर व बाहेरही पसरलेले आहेत. इतकेच नव्हे तर, काशी-रामेश्वर-नाशिक व नेपाळातील पशुपतेश्वर या देवस्थानातील क्षेत्रोपाध्याय कऱ्हाडेच आहेत. तथापि, ते मुळात करहाटक प्रांतातून कोकणात आले व कऱ्हाडे झाले हे खरे.

कऱ्हाड्यांचे व्यवसाय : इतिहासकाळात बहुतेक कऱ्हाडे खोत, इनामदार, सरदेसाई, देसाई, सरदेशपांड्ये, पोतदार, सरपोतदार, सरमुकादम, सबनीस, कारखानीस इत्यादी हुद्देदार होते. त्यामुळे त्या काळात त्या गावचे किंवा विभागाचे प्रमुख पद यांच्याकडे असे. सांप्रत कऱ्हाडे ब्राह्मण भारताच्या सर्व भागांत आढळतात व निरनिराळे व्यवसाय करतात.

आपल्या ज्ञातीतील काही आदर्श

असामान्य बुद्धिमत्तेच्या व कर्तृत्वाच्या जोरावर कऱ्हाड्यांनी

जीवनातील अनेक क्षेत्रे पादाक्रांत करून आपल्या पेशात विविधता आणली आहे. साहित्य, काव्य, राजकारण, नाटक, संगीत, इतिहास, शास्त्र, गणित, शल्यचिकित्सा, चित्रकला, उद्योग, कारखानदारी वगैरे एकही क्षेत्र असे नाही की, जेथे कऱ्हाडा चमकला नाही.

अद्वितीय रणरागिणी झाशीची राणी लक्ष्मीबाई भारतातील राजकारणपटुत्व असलेली पहिली स्त्री ठरते. मुंबई प्रांतातील पहिले मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, स्वतंत्र भारताचे पहिले सभापती दादासाहेब मावळंकर, भारताचे पोलादी गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत आणि अनेकांनी भारतीय राजकारणात बहुमोल कार्य करून आपली नावे चिरस्मरणीय केली आहेत.

साहित्यातील कऱ्हाड्यांचे मानदंड लिहू घातले तर तो एक विस्तीर्ण खंडच होईल. महानुभाव पंथ प्रस्थापित करणारे श्री चक्रधर, नव्या युगाची नांदी करणारे 'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकर, 'आर्या मयूरपंताची' यथार्थत्वाने सार्थ करणारे मोरोपंत पराडकर, धर्मसिंधुकारक पाध्ये, कादंबऱ्यांनी रसिक महाराष्ट्रास डोलावणारे श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर, ज्ञानपीठ पारितोषिक विजेते भाऊसाहेब खांडेकर, शंकरराव किर्लोस्कर, धनुर्धारी टिकेकर, महाकवी यशवंत, राजकवी भास्करराव तांबे, महाराष्ट्र टाइम्सचे गोविंद तळवलकर, साहित्य संमेलनाध्यक्षा दुर्गा भागवत, नाट्य संमेलनाचे अध्यक्ष भालचंद्र पेंढारकर, माडखोलकर, प्रभाकर पाध्ये, श्री. रा. टिकेकर, काटदरे आदी अनेक नावे वानगीदाखल देता येतील.

पं. भास्करबुवा बखले, गोविंदराव टेंबे, पेंढारकर, जगन्नाथबुवा पुरोहित, पं. जितेंद्र अभिषेकी यांनी आपल्या कर्तृत्वाने संगीतक्षेत्र झळाळून टाकले. इतिहास संशोधनात रियासतकार सरदेसाई, शेजवलकर, प. कृ. गोडे यांनी केलेले कार्य अनन्यसाधारण आहे. आजही आधुनिक महाराष्ट्राचे भीष्माचार्य दादासाहेब पोतदार ते कार्य या वयातही नेटाने चालवीत आहेत. मराठी नाटकाच्या इतिहासात तर किर्लोस्कर, वसंत कानेटकर, शं. ना. नवरे यांच्या नाटकांनी उभ्या महाराष्ट्राला वेड लावले आहे. अभिनयात पेंढारकर पती-पत्नी, प्रभाकर पणशीकर, दाजी भाटवडेकर, शदर तळवलकर हे लाजबाब आहेत.

आयुर्वेद म्हटला की धूतपापेश्वरचे पुराणिक, सांडू, गुण्ये हीच नावे डोळ्यांसमोर येतात. स्वस्तिक रबरचे वैद्य, सप्रे, किर्लोस्कर प्रभृतींनी औद्योगिक महाराष्ट्र जगाच्या नकाशात नेऊन बसविला आहे. चित्रकलेत देऊसकर, सातवळेकर पिता-पुत्र, गुर्जर हे बिनीचे मानकरी ठरले आहेत. न्याय खात्यात न्या. ढवळे, न्या. तांबे, न्या. सप्रे ही नावे सर्वांच्या परिचयाची आहेत. नुसते तळवलकर हे आडनाव व्यायाम, डॉक्टरी, उद्योग वा अभिनय सुचविते. सुप्रसिद्ध गणिती जयवंतराव नारळीकर यांनी अत्यंत तरुण वयात शास्त्रज्ञ म्हणून जगन्मान्यता मिळवली आहे. अशी अक्षरशः शेकडो उदाहरणे सांगता येतील.

संग्राहक- अविनाश मणेरीकर, सावंतवाडी .

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास हार्दिक शुभेच्छा!

प्रथमच लहान मुलांसाठी
आयुर्वेदिक उपचार

॥शिशुर्वेद॥

॥ayurveda॥

**डॉ. चंद्रशेखर एन्. तांबे**
B.S.A.M.
**जगन्नाथ दिनकर क्लिनिक**
नवीन शनिमारुती मंदिरासमोर
**रामाचा गोट, सातारा - ४१५ ००२.**
मो. ९८२२४ २४८६५

## संस्कृत सुभाषिते

**रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्**
**भास्वानुदेष्यति हसिष्यति पमजश्रीः।**
**इत्थं विचिन्तयति कोशगते द्विरेफे**
**हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार॥**

(दैवाचा कल्पनेत नसलेला हस्तक्षेप.) रात्र संपेल, सकाळ होईल, सूर्य उगवेल, कमळ फुलेल- कमळाच्या कोशात अडकलेला भुंगा असा विचार करीत असतांनाच अरेरे, हत्तीने कमळाची वेलच उपटली!

# अरेच्या, मी लेखक झालो!

माझी आई नेहमी सांगत असे, माणसाला आवड असली की सवड मिळते. स्वेच्छानिवृत्तीनंतर मला सवडच सवड मिळाली. त्यामुळे उदंड लेखन करायचे, नावलौकिक मिळवायचा, असा विचार पक्का केला. शुभ कार्याला विलंब कशाला, म्हणून तडक बाजारात गेलो. दोन दस्ते आखीव कागद, तसेच उत्तम चालणारी भारीतली दोन पेन्स खरेदी केली. लिखाणाची प्रारंभिक तयारी जय्यत केल्याचे तरी किमानपक्षी समाधान लाभले. एकदा का लिखाणाची शृंखला लागली- म्हणजे उगीच कागद संपले, रिफील संपली, असल्या लहान-सहान कारणांनी लिखाणात खंड नको म्हणून लेखन-साहित्याची खरेदी थोडी सढळ हाताने केली, इतकचं. सौ.ना ऑफिसला जाताना निरोप देऊन मी लिखाणाच्या संकल्पपूर्तीसाठी आसनस्थ झालो. अर्धा तास पाऊण तास, दीड तास झाला तरी पेनचे टोपण काढण्याचा काही योग येईना. शेवटी शरीर स्वस्थ बसू देईना, म्हणून आसन सोडले. उद्विग्न मनाने घराच्या बाहेर पडलो.

मनाच्या अशा नाजूक अवस्थेत कुणीही ओळखीची व्यक्ती भेटू नये, असे वाटत असतानाच नको असलेली माणसे दत्त म्हणून भेटतात. मलासुद्धा माझा लेखक मित्र अगदी दत्त म्हणून भेटला. ''आज एवढा उदास चेहरा का?'' या वाक्याने त्याने सुसंवादाला सुरुवात केली. आपले दुःख दुसऱ्याला सांगितल्याने हलके होते, असे कुठेतरी वाचल्याचे मला आठवले आणि मी माझी व्यथा त्याला सांगितली. ''तुम्हाला बुवा कसे काय विविध विषयांवर लेखन करायला सुचते?'' माझ्या या प्रश्नावर तो म्हणाला, ''आधी मला हे सांग की, तू कोणत्या दिशेला तोंड करून लिहायला बसला होतास?'' लिखाणाचा आणि दिशेचा काय संबंध, हे मला समजेना. तथापि, उगीचच आपले अज्ञान प्रगट व्हायला नको म्हणून मी मौनाचा आधार घेतला. मनात घराचे चित्र उभे केले, मनातल्या मनातच हातवारे केले आणि माझ्या लक्षात आल की आपण दक्षिण दिशेकडे तोंड करून लिहायला बसलो होतो. मी त्याला सांगितले की दक्षिण दिशेकडे तोंड करून लेखनासाठी आसनस्थ झालो होतो. त्यावर तो ताड्कन म्हणाला, ''तरीच तुला काही लिखाण सुचले नाही. अरे बाबा, दक्षिण दिशा अशुभ असते. मी तुला आता एक रामबाण उपाय सांगतो. उत्तर दिशेकडे तोंड करून लिखाणाला प्रारंभ कर, म्हणजे बघ तुझे लिखाण कसे उत्तरोत्तर बहरत जाईल. तुझ्या हातून उदंड लेखन होईल. अनुभवाचे बोल आहेत. उगीच नाही काळ्याचे पांढरे झाले!'' माझी नजर त्याच्या सपाट मैदानावर खिळली. माझ्या मनात विचार आला की, यापूर्वी जर हा आपल्याला भेटला असता तर एव्हाना विपुल लेखन आपल्या हातून झाले असते. काय सांगावे, कदाचित ज्ञानपीठ पुरस्कारसुद्धा मिळाला असता! अर्थात प्रत्येक गोष्टीची वेळ यावी लागते, हेच खरे. माझ्या लेखक मित्राच्या अन्य मार्गदर्शक सल्ल्यांची शिदोरी बरोबर घेऊन व त्याचे मन:पूर्वक आभार मानून मी नव्या उमेदीने, जिद्दीने मार्गस्थ झालो.

आपल्या हातून आता उदंड लेखन होणार, या सुखद विचारात मी रात्री केव्हा झोपी गेलो, ते माझे मलाच समजले नाही. आणि 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' याची अनुभूती आली... माझ्या हातून अनेक ग्रंथ लिहून झाले आहेत.... धार्मिक, मार्मिक, संवेदनशील, विनोदी लेखक म्हणून साहित्यक्षेत्रात माझ्या नावाचा दबदबा वाढला आहे... वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, ग. दि. माडगूळकर, वि. वा. शिरवाडकर, पु. ल. देशपांडे अशा दिग्गज लेखकांत आता माझ्या नावाची गणना होऊ लागली... अनेक मानसन्मानांनी मला सन्मानित करण्यात आले... मला ज्ञानपीठ पुरस्कार जाहिर झाला... कौतुकाचे शब्द, गळ्यात हारांचे ओझे, पाठीवर कौतुकाच्या थापा मी अनुभवत असतानाच एका बुलंद हाकेने मी दचकून जागा झालो. एका गोड भावविश्वातून वास्तवात आलो.

''उठा सूर्यवंशीऽऽ'' दुपारी झोपा काढा, वगैरे वगैरे. तथापि, अशा बोचऱ्या शब्दांनी नाउमेद होण्यातला माझा पिंड नव्हता. मंडळींना हसत-हसत ऑफिसला निरोप देऊन मी लेखनासाठी आसनस्थ झालो. देवाजवळ समई, उदबत्ती लावली. मस्तकी अंगारा, मोठमोठ्या संतमंडळींचे ग्रंथ म्हणे समईच्या मंद प्रकाशात पूर्णत्वास गेले म्हणून समई लावून थोडा धार्मिक झालो. सकाळीच उत्तर दिशा कोणती आहे याची खात्री करून घेतली, होती. उगीचच चूक व्हायला नको म्हणून थोडी काळजी घेतली इतकेच. उत्तरेकडे तोंड करून लेखनासाठी आसनस्थ झालो. कागदावर 'श्री गजानन प्रसन्न' असे लिहायला सुचले. वाटले, आता लिखाणाची गाडी सुसाट धावणार. तथापि, एक तास झाला तरी काहीच प्रगती दिसेना. दोन तासांनी मात्र माझा स्टॅमिना संपला. शरीराने असहकार पुकारला. श्री गजानन प्रसन्न

# पेढी

आम्ही सर्व म्हणजे आई-वडील, आजी- आजोबा, भाऊ-बहीण असे पूर्ण कुटुंब प्रयाग यात्रेला दिनांक ४ मे १९५६ रोजी आठ दिवसांकरिता निघालो. सर्वांत आधी प्रयाग (अलाहाबाद) ला पोहोंचलो. त्रिवेणी संगमावर वेणीदान (धार्मिक विधी) केले. त्यानंतर ब्राह्मणभोजन आटोपून काशीला ३ दिवसांनी पोहोचलो. तिथे गंगास्नान व सर्प घाट, मनकर्णिका घाट, दशाश्वमेघ घाट इत्यादी स्थळांचे मनःपूर्वक दर्शन घेतले आणि नंतर गया अर्थात मातृगया करून आम्ही परत आपल्या गावी परतत होतो.

येताना काशीला कुठे तरी गाडीला अपघात झाल्यामुळे दोन दिवस एका स्टेशन (मुगलसराई) ला अडकून पडावे लागले. रतलामहून रेल्वेचा पास सर्वांचा व मोजकी येण्या-जाण्याची सवड असल्यामुळे जवळ काही उरले नाही. अजून तीन दिवसांनी घरी पोहोचू असे धरून व गाडी ४८ तासांनी मिळणार म्हणून मोठी बहीण, मी व वडील स्टेशनबाहेर पडलो. बाजारात गेल्यावर जवळ असलेल्या, आजीकडील हातातल्या दोन पाटल्या (दीड तोळ्याची एक) घेऊन एक पेढीवर (सोनाराकडे) गेलो. 'हे घेऊन किती पैसे येतील' अशी चौकशी केली, तर त्या वेळेस ६३ रु. तोळा भाव होता, तर साधारणपणे रु. २०० मिळणार होते. वडिलांनी 'नाही' म्हटले, तर दुसऱ्या पेढीवर गेलो. वाटले, त्यापेक्षा जास्त मिळतील, पण दुसऱ्याने फक्त १२६ रु. सांगितले. मी म्हटले, यापेक्षा तिथे जास्त देतो आहे. मग आम्ही परत पहिल्या दुकानी आलो. विचारले, तर त्यांनी पण १२६ रु. सांगितले व बोलला 'ही पेढी आहे' लक्षात ठेवा. आम्ही दागिना न देता परतलो.

देव कसा व कुठे भेटेल याचा मला बराच अनुभव आहे. येताना मनात आले चला, मंदिर आहे, दर्शन करून जाऊ या. रस्त्यात मंदिर होते. आत गेलो. रामाचे मंदिर होते. नमस्कार केला. रामरक्षा म्हणालो, तर काय चमत्कार की, जो पंडित होता, तो लगेच आला आणि प्रसाद-तीर्थ दिले व त्याने विचारले? कुठून आला आपण, सर्व विचारपूस करून ''मी तुमची काही मदत करू का?'' असे विचारले. मी फक्त हीच बातमी सांगितल्यावर त्याने आम्हा तिघांना, चहा-पोह्यांचा नाश्ता करवून ५०० रु. हातात ठेवून म्हणाला, ''मी पण रतलामचाच आहे. काळजी करू नका, मी येईन तेव्हा मला परत करा.'' मी म्हणालो ''तुम्ही रतलामला कोठे व कुणाला ओळखता?'' तर तो म्हणाला ''मी रतलामला 'सज्जन मिल'मध्ये विव्हिंग मास्तर होतो, आज आईमुळे येथे राहावे लागत आहे.''

हा सर्व सोपस्कार आटोपून आम्ही स्टेशनवर आलो. पण मनाने देवाला शत-शत नमन करून त्याच्या चमत्काराला वंदन करीत तीन दिवसांनी आम्ही सर्व रतलामला सुखरूप पोहोचलो. देवाची करणी, मनुष्याची आशा व मोठ्यांचे आशीर्वाद नेहमी कारणी पडतात.

मुगलसराई स्टेशनवर रात्री थोडे फार खाऊन, रात्रीच्या ट्रेनने दोन दिवसांत परत आलो. अर्थात, रतलामला परत आल्यावर त्या पुजारी पंडिताशी सम्पर्क करून त्याचे पैसे आभार व धन्यवादासकट परत केले.

**श्रीकृष्ण शांताराम आंबेकर**
बडोदा (गुजरात) ९४७९७ ८९४५५

---

मागील पानावरून

**अरेच्या मी लेखक झालो तर...**

यात्र्यतिरिक्त पेनाचा वापर झाला नव्हता.

उदास मनाने बाहेर पडलो. मनात विचार आला की, लेखन हा आपला प्रांत नाही. नशीब तरी किती खडतर... कालचाच लेखक मित्र परत भेटला. त्याची नजर चुकवून जाणार इतक्यात, त्याने मला मोठ्याने हाक मारली. ''काय, मात्रा लागू पडली की नाही?'' मी मनात म्हटलं, हा लेखक आहे का वैद्य? अर्थात त्याच्या प्रश्नाला उत्तर देणे क्रमप्राप्त होते. चेहऱ्यावर उसने हास्य आणण्याचा प्रयास करीत म्हणालो, ''प्रयत्न चालू आहे'' आणि चक्क काढता पाय घेतला.

आजवर अनुभवाच्या शिदोरीतील निवडक आठवणी मी शब्दबद्ध केल्या. तथापि, त्या शब्दफुलांना प्रतिभेचा गंध लाभला नाही. प्रतिभा ही ईश्वराने माणसाला दिलेली सर्वश्रेष्ठ देणगी आहे. साहित्य हा प्रकार प्रतिभावंताच्या कल्पकतेचा सुंदर आविष्कार असतो. ही भाग्यरेषा घेऊनच सिद्धहस्त लेखक, कवी जन्माला येतात. मात्र ज्यांच्या ललाटी हे भाग्य नाही, त्यांनी या प्रांताकडे वळायचेच नाही का? वर्णगत स्वभाव ते ज्ञानी स्वभाव असा जीवनाला सुंदर, गंधित करणारा प्रवास शक्य नाही का? अरेच्या मी लेखक झालो असे प्रश्नचिन्ह मला पडणे आणि वास्तव यामधील उत्तर नसणे, हे जरी खरे असले तरी माझे प्रामाणिक प्रयत्न माझ्या अंतर्मनाला सुखावून जातात.

**श्री. बाळासाहेब भाटे**,सातारा,
भ्रमणध्वनी : ९४२२४ ०२६४९



**शुभ दीपावली**

# सफर स्वप्नभूमीची अर्थातच लंडन आणि स्कॉटलंडची
## (प्रवासवर्णन)

पर्यटन हे आपल्या आयुष्यात असलेले अविभाज्य अंग आहे. प्रत्येक जण हा कधी तरी पर्यटन करतोच. मुळातच आवड असेल, तर त्याचा आनंद अवर्णनीय असतो. माझा मुलगा सौरभ, त्याची पत्नी अवंती व नातू अगस्त्य, हे एडिनबर्गला राहत असल्यामुळे व त्यांच्या आग्रहामुळे आम्ही लंडन आणि मुख्यत्वेकरून स्कॉटलंडला जाण्याचे ठरविले. सौरभने एडिनबर्ग सोडून सर्व ठिकाणी राहण्याची, प्रेक्षणीय स्थळे बघण्यासाठी लागणारी तिकिटे अगोदरच विहित कार्यक्रमानुसार आम्हाला ईमेलद्वारे पाठवली असल्याने आमची सहल वेळेवर आणि कोणताही गोंधळ न होता पार पडणार याची आम्हाला खात्री झाली.




पुणे-मुंबई-लंडन असा जवळपास वीस तासांचा विमान प्रवास झाल्यावर, साहेबांच्या देशात आयुष्यात प्रथमच पाऊल टाकले. थोडेफार शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या लंडनमध्ये स्थिरस्थावर झाल्यावर, 'पाऊले चालती पंढरीची वाट' या धर्तीवर आमची पावले लंडन शहर बघण्यासाठी बाहेर पडली. बाहेर पडल्यावर एक गोष्ट लक्षात आली आणि ती म्हणजे- इंग्लंडचे नागरिक वाहतूकव्यवस्था, शिस्त याबाबतीत एकदम सजग आहेत, तितकेच सहकार्य करणारे आहेत. त्यामुळे कुठेही जाण्याची आणि भाषेची अडचण जाणवत नाही.

आम्ही ओएस्टेर कार्ड रीचार्ज करून घेतले. त्यामुळे लंडनच्या सार्वजनिक वाहतूकव्यवस्थेचा म्हणजे बस किंवा रेल्वेचा उपयोग करता येतो. महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक ठिकाणी वारंवार तिकीट काढायची गरज राहत नाही.

लंडन हे थेम्स नदीच्या काठावर वसलेले असून या शहराला प्रचंड जुना इतिहास आहे. लंडन हे अर्थ, कला, क्रीडा, उद्योग, साहित्य अशा अनेक क्षेत्रांमध्ये जगातील एक प्रमुख शहर आहे. आज जगातील सर्वाधिक पर्यटक लंडनमध्ये येतात. लंडनच्या समाजरचनेमध्ये कमालीचे वैविध्य आहे. एका आकडेवारीनुसार लंडन आणि लंडन शहराच्या परिसरात साधारणपणे तीनशे भाषा बोलल्या जातात. वाहतूक आणि दळणवळणच्या बाबतीत लंडन हे शहर जगातील बहुतेक सर्व महत्त्वाच्या शहरांशी हवाई, रेल्वे, रस्ते मार्गाने जोडलेले आहे. युरोस्टार ही चॅनेल टनेलमधून जाणारी अतिजलद रेल्वेसेवा लंडन-पॅरिस-ब्रुसेल्स या शहरांना जोडते. पाश्चिमात्य शास्त्रीय आणि रॉक संगीताच्या इतिहासात लंडनला मानाचे स्थान आहे. बीटल्स, रोलिंग स्टोन्स, पिंक फ्लोइद, क्वीन हे जगातील सर्वांत लोकप्रिय बॅंड लंडनमध्येच आहेत. यात शहरात कमी-जास्त चाळीस विद्यापीठे कार्यरत आहे. हासुद्धा एक विक्रम आहे, कारण युरोपियन राष्ट्रातदेखील एवढी विद्यापीठे नाहीत.

या सर्व गोष्टींशिवाय लंडनमध्ये एक वेळ तरी भेट देऊन बघावे अशी अनेक ठिकाणे आहेत. सांगायचे झाले तर जागा कमी पडेल, पण काही महत्त्वाची ठिकाणे म्हणजे, रॉयल अल्बर्ट हॉल, हाईड पार्क, वेस्टमिनिस्टर ॲबे, बिग बेन, पार्लमेंट हाऊस, बकिंगहॅम पॅलेस, ऑक्सफोर्ड स्ट्रीट, लॉर्ड्स क्रिकेट मैदान, टॅफलगार स्क्वेअर, टॉवर ब्रिज, म्युझियम्स, लंडन आय, मादाम तुस म्युझियम अशी किती तरी ठिकाणे आहेत की, बघायला दिवस काय, महिने पण पुरणार नाहीत. जागेच्या आणि वेळेच्या मर्यादेमुळे प्रत्येक ठिकाणाचे वर्णन करणे शक्य नाही, पण सगळे कसे नजरेसमोर आहे. बकिंगहॅम पॅलेससमोरील सकाळी होणारी इंग्लंडच्या राणीच्या गार्डची परेड तर खरेच अप्रतिम होती. असो. हे जरी इंग्लंडच्या नागरिकांकरिता रोजचे, असले तरी माझ्याकरिता नवलच होते. पण कधी




वाजता सूर्यदेव आपल्या ड्युटीवर हजर असतात. नॉर्वे, स्वीडन आणि उत्तर दक्षिण ध्रुवावर काय मजा येत असेल याची एक झलक ना कधी एक वेळ अशी येतेच की, आपल्याला आवडणाऱ्या गोष्टी सोडाव्या लागतात. आता ती वेळ आमच्यावर आली होती. थोडक्यात काय, तर लंडनहून स्कॉटलंडकडे प्रयाण करण्याची वेळ आली होती.

आम्ही ठरल्याप्रमाणे लंडनच्या व्हिक्टोरिया क्रॉस या बस स्थानकाहून स्कॉटलंडची राजधानी एडिनबर्गकडे प्रयाण केले. एक दिवस आमच्या सौरभकडे विश्रांती घेऊन स्कॉटलंड दर्शनसाठी निघालो. 'मिनी स्वित्झर्लंड' असे सामान्यपणे स्कॉटलंडला म्हटले जाते. इंग्लंडच्या उत्तरेचा आणि निसर्गसौंदर्याने भरलेला देश म्हणजे स्कॉटलंड. आमच्या टूरच्या कार्यक्रमानुसार फोर्ट विल्यम डेसाठी प्रस्थान केले. फोर्ट विल्यमला 'The outdoor capital of UK' असेही म्हणतात. इंग्लंडच्या बऱ्याच उत्तरेला स्कॉटलंड आणि त्यात फोर्ट विल्यम आणखीन उत्तरेला, त्यामुळे ऐन उन्हाळ्यात बऱ्यापैकी थंडी होती. जवळच असलेल्या 'लॉक लीन्हे'चे निळेशार शांत पाणी, तळ्यात शांतपणे पोहणारी बदके, नेत्रांमध्ये सामावणारे सृष्टि-सौंदर्य या सर्व गोष्टी वेड लावणाऱ्या होत्या, हे नक्की.

स्कॉटलंडमध्ये उन्हाळ्यात सूर्यास्त उशिरा होतो, साहजिकच अंधार पडायला मध्यरात्रच होते. परत पहाटे अगदी चार

आपल्याला स्कॉटलंडमध्ये बघायला मिळते. स्कॉटलंडमध्ये प्रवेश केल्यावर काही महत्त्वाचे शब्द कळले. ते म्हणजे- लॉक अर्थात तळे, बेन म्हणजे पर्वत, ग्लेन म्हणजे दरी. या शब्दांचा वापर स्कॉटलंडमध्ये अगदी भरपूर आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, संपूर्ण इंग्लंडमध्ये चलन पौंड असले तरी ते सरसकट वापरले जात नाही. स्कॉटिश पौंड हे त्यांचे दैनंदिन व्यवहाराचे चलन. स्कॉटलंडमधील सर्व रहिवाशांना आपण स्कॉटिश असल्याचा प्रचंड अभिमान आहे. एक मे सतराशे सातपर्यंत स्कॉटलंड हा एक सार्वभौम देश होता. या दिवशी झालेल्या एका तहानुसार स्कॉटलंड इंग्लंडमध्ये सामील झाला.

उत्तर व पश्चिमेस अटलांटिक महासागर तर पूर्वेस उत्तर (North Sea) समुद्र आहे. स्कॉटलंडमध्ये ग्लासगो हे सर्वांत मोठे शहर म्हणून ओळखले जाते, तर एडिनबर्ग हे क्रमांक दोनचे शहर असून स्कॉटलंडची राजधानी आहे. तसेच ते शहर स्कॉटलंडची आर्थिक राजधानी देखील आहे. स्कॉटिश शिक्षण संस्था इंग्लंडपेक्षा वेगळी आहे. स्कॉटलंडमध्ये विस्तृत शिक्षणावर भर



दिला जातो. स्कॉटलंडमध्ये भरपूर प्रमाणात खनिज तेल आढळून येते. खऱ्या अर्थाने समृद्ध प्रदेश म्हणजे स्कॉटलंड, असे म्हटले जाते ते उगाचच नाही.

स्कॉटलंडमध्ये निसर्गसौंदर्याची भरभराट आहे. पावला- पावलावर निसर्ग तुमचे-आमचे स्वागत करण्यासाठी सज्ज असतो. 'लॉक लीन्हे, लॉक नेस, लॉक लोकी' यांसारखे मोठे तलाव अत्यंत रमणीय, सुंदर आणि शांत वातावरणात आपल्याला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. 'बेन नवीस' हा इंग्लंडमधील सगळ्यात उंच पर्वत आहे. याची उंची अंदाजे ४४०० फूट आहे.

स्कॉटलंडमध्ये एक आणखी प्रेक्षणीय गोष्ट म्हणजे स्विंग ब्रिज. या ब्रिजची रचना अशी असते की- एखादी बोट किंवा जहाज कालव्यातून जाणार असेल, तर थोड्या वेळासाठी रस्ता बंद करतात. स्विंग ब्रिज उजवीकडे फिरवतात. बोट किंवा जहाज त्या ब्रिजला ओलांडून पलीकडे गेले की, परत मूळ ठिकाणी ब्रिज आणून वाहतूक सुरू करतात. असे स्विंग ब्रिज स्कॉटलंडमध्ये पुष्कळ ठिकाणी दिसतात. ओईक नदीला असंख्य कालवे येऊन मिळतात, 'लॉक नेसा' या तलावामध्ये. लॉक नेस क्षितिजापर्यंत गोड पाण्याचा समुद्रच म्हणायला हवा. हा तलाव आणि परिसर बघण्यासाठी बोटीमधून दोन

तासांच्या टूर्स असतात. 'लॉक नेस' प्रसिद्ध आहे तो आपल्या निसर्गसौंदर्यासाठी आणि केंव्हा तरी कोणाला तरी दिसलेल्या लॉक नेस मॉनस्टरसाठी. याबाबत अनेक दंतकथा प्रचलित आहेत, एवढे नक्की. स्कॉटलंडचे निसर्गसौंदर्य डोळ्यांत साठवून आम्ही आता ग्लासगोला आलो.

येथे असलेल्या जहाजबांधणी उद्योगामुळे हे व्यापाराचे केंद्र आहे. याशिवाय शहरात जॉर्ज स्क्वेअर, गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, चर्च, सायन्स सेंटर, केल्विनग्रोव पार्क म्युझियम ही प्रमुख ठिकाणे अगदी बघायलाच हवीत. आता आमच्या सहलीचा शेवटचा टप्पा होता एडिनबर्ग. ग्लासगोपासून एक ते दीड तासाच्या अंतरावर आहे.

एडिनबर्ग ही स्कॉटलंडची राजधानी. हे राजधानीचे शहर असूनदेखील लंडनच्या तुलनेमध्ये अगदी वेगळे आहे. कुठलीही धावपळ-गडबड नाही. सगळे कसे एकदम निवांत. एडिनबर्ग आणि परिसरात प्रेक्षणीय स्थळे पुष्कळ आहेत. ती सर्व ठिकाणे बघायला एक आठवडादेखील अपुरा आहे. एडिनबर्गचे जुने शहर आणि नवे शहर असे दोन भाग आहेत. जुन्या भागात ग्रास मार्केट, एडिनबर्ग कॅसल, नॅशनल म्युझियम ऑफ स्कॉटलंड, पॅलेस ऑफ हॉलीरूड हाऊस, कालटन हिल, अवर डायनामिक अर्थ, अशेर हॉल, नॅशनल पोर्ट्रेट गॅलरी, मुझियम ऑफ चाइल्डहूड आणि शहराच्या नव्या भागात रॉयल बोटॅनिक गार्ड, रॉयल याच ब्रिटानिका, क्रेमंड आयलंड, क्रेगकुक कॅसल, सेंट मेरीज कॅथेड्रल इत्यादी खूप आवर्जून बघण्यासारखी ठिकाणे आहेत एडिनबर्गमध्ये. एक आणखीन विशेष म्हणजे स्कॉटलंडमध्ये ऐतिहासिक आणि जागतिक वारसा असलेल्या बहुसंख्य इमारती आहेत. या इमारतींच्या दुरुस्तीसाठीदेखील परवानगी घ्यावी लागते.

एकूण काय- अनेक संस्कृती, इतिहास, भूगोल यांचा अभूतपूर्व संगम म्हणजे स्कॉटलंड. एक जन्म पुरणार नाही इतक्या वैविध्यपूर्ण गोष्टी बघण्यासारख्या आहेत. संस्कृती जन्माला येते आणि वाढते ती निसर्गाच्या सान्निध्यात. विविध भाषा, संस्कृती यांचा सुंदर संगम आपल्याला स्कॉटलंडमध्ये बघायला मिळतो. यामुळेच स्कॉटलंड आहे खास आणि आपले वेगळे अस्तित्व अजूनही जपून आहे.

लेखक : **श्रीपाद टेंबे**
ए- ३०१, पारिजातक को-ऑप हाउसिंग सोसायटी,
नवश्या मारुती मंदिराजवळ, सिंहगड रस्ता, पुणे.
४११०३०.
मोबाईल : ९१५८०८८०४२.
इमेल : shripad.tembe@gmail.com

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास
हार्दिक शुभेच्छा!

**आर्या फूड प्रॉडक्ट्स**

यांची दर्जेदार, पौष्टिक व रुचकर उत्पादने

* खजूर डिंक लाडू
* ड्रायफ्रूट खजूर लाडू
* डिंक लाडू
* पाचक सुपारी

प्रोप्रा.- सौ. वैदेही करंबेळकर
मो. ९४२३१ ३६४८१
मंगळवार तळे, सातारा - ४१५००२.
अग्रज फूडस्, कोथरूड व टिळक रोड, पुणे येथे उपलब्ध

**दीपावली निमित्त**
**हार्दिक शुभेच्छा!**
सुहास भागवत, डोंबिवली
मो. ९८७०४ २३०७१

# ॲलोपॅथिक मेडिकल सायन्सची वास्तविकता

ॲलोपॅथिक मेडिकल सायन्सने इतकी उन्नती केली असूनही पृथ्वीवर क्वचितच एखादी निरोगी व्यक्ती पहावयास मिळेल.

'हर बिमारी के लिये गोली नहीं है, मगर हर गोली एक ना एक बिमारी जरूर पैदा कर रही है' असे म्हटले तर वावगे ठरू नये.

प्रत्येक कुटुंबातील एक ना एक सदस्य कोणत्या तरी व्याधी ने (शारीरिक ना मानसिक ) ग्रस्त आहे. संपूर्ण मेडिकल व्यवस्था भयानक भ्रष्टाचाराने ग्रस्त झालेली आहे. रक्त-लघवीच्या अनावश्यक तपासण्या, X-Ray, सिटी स्कॅन, MRI, अनावश्यक ऑपरेशनचे एक महाभयंकर जाळे असे पसरवलेलं आहे की, लोक काही समजण्याआधीच या भ्रष्ट व्यवस्थेला बळी पडत आहेत. पूर्ण विश्वातील मानवाला व्याधींनी ग्रस्त करून मृत्यूपर्यंत नेण्याचे सर्वाधिक श्रेय ॲलोपॅथीला जाते. एके काळी ॲलोपॅथी मनुष्यप्राण्यासाठी वरदान सिद्ध झाली होती. आज मात्र ॲलोपॅथीमुळे संपूर्ण मानवजातीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.

ADR म्हणजे ॲडव्हर्स ड्रग रिॲक्शन- संपूर्ण जगामध्ये मानवी मृत्यूचे सर्वांत मोठे कारण ADR आहे. आपण जी ॲलोपॅथिक औषधे घेतो, त्यांचा आपल्या शरीरावर प्रतिकूल प्रभाव पडतो व शरीर हळू- हळू रुग्ण होत जाते. दिवसेंदिवस वाढत जाणारी आजारी माणसांची व मोठमोठ्या हॉस्पिटलची संख्या हे कशाचे द्योतक आहे? सर्व प्रगत देशांमध्ये- जिथे सर्वाधिक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल आहेत, आयसीयू युनिट्स आहेत, मल्टिस्पेशिअलिटी हॉस्पिटल आहेत, नेओनेटलॉजी युनिट्स आहेत- तिथे लोकांचे आरोग्य सर्वाधिक खराब आहे असे UNO २००७ च्या सर्वेक्षणामध्ये नमूद करण्यात आले आहे.

कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी उपयोगात येणारे स्टॅटिन्स या औषधामुळे दर वर्षी ११लाख लोकांना मधुमेह (diabetis) होतो. टाइम्स ऑफ इंडियाच्या एका रिपोर्टमध्ये असे नमूद केले आहे की, भारतात पोलीस व्यवस्थेनंतर सर्वांत महाभ्रष्ट व्यवस्था ही आजची मेडिकल व्यवस्था आहे. ॲलोपॅथिक चिकित्सा प्रणालीवर मोठ्या औषधी कंपन्यांचे घनिष्ठ जाळे असून औषधांबद्दल चुकीची माहिती डॉक्टरांना देऊन त्यांना दिग्भ्रमित केले जाते आणि अनेक चुकीची औषधे रुग्णांच्या माथी मारली जातात. जगातील अनेक प्रगत देशांमध्ये प्रतिबंधित औषधे आपल्या देशात मुक्तहस्ते उपयोगात आणली जातात.

न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन ही ॲलोपॅथिक चिकित्सा जगतातील सर्वाधिक मान्यताप्राप्त पत्रिका असून ह्या पत्रिकेच्या मुख्य संपादिका मार्सिया एंजेलिस आहेत. त्या अत्यन्त सन्मानित ॲलोपॅथिक डॉक्टर असून अमेरिकन नागरिक आहेत. त्यांनी आपल्या 'द ट्रुथ अबाऊट ड्रग कंपनीज' या पुस्तकात भ्रष्ट औषधी कंपन्यांची कुकृत्ये, त्यामुळे भरडला जाणारा जगभरातील रुग्ण व सामान्य माणूस ह्याबद्दल पुराव्यानिशी वाभाडे काढले आहेत. आणखी एका पुस्तकाने संपूर्ण जगात खळबळ उडवून दिली आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे 'ओव्हर डोस अमेरिका' या पुस्तकाचे अमेरिकी लेखक डॉक्टर जॉन अब्राहम यांनी संपूर्ण जगाला पुराव्यानिशी हे दाखवून दिले आहे की, अमेरिकेसहित संपूर्ण जगाचे स्वास्थ्य ॲलोपॅथिक औषधांमुळे कसे खालावत चालले आहे. हे लेखक सुप्रसिद्ध हार्वर्ड स्कूल ऑफ मेडिसिनचे मानद सदस्य आहेत. जगभरातील लोकांचे आजार वाढण्यामागे ॲलोपॅथिक चिकित्सा व्यवस्थेचे घोर अपयश कारणीभूत आहे. ज्या अमेरिकेला चिकित्साविज्ञानाचे मक्का-मदिना म्हटले जाते, तिथेही आरोग्याच्या बाबतीत होत असलेली घोर दुर्दशा हे कशाचे द्योतक आहे?

ॲंटिडिप्रेसंट औषधी, antiboitics, कोलेस्टेरॉलची औषधे यामध्ये साक्षी बदलवून, आकड्यांचा भयंकर उलट फेर करून सर्व जगाला दिग्भ्रमित केले आहे.

यानंतर आणखी एका पुस्तकाने संपूर्ण जगाला हादरवून सोडले आहे, त्या पुस्तकाचे नाव आहे- "DEATH by PRISCRIPTION" या पुस्तकाचे लेखक सुविख्यात अमेरिकन डॉक्टर असून त्यांचे नाव DOCTOR RESTRAIN हे आहे. डॉक्टर्स कशा प्रकारे आपल्या पेशंट्सना (रुग्णांना) मृत्यूपर्यंत पोहोचवत आहेत, याचे संपूर्ण पुरावे त्यांनी त्यात नमूद केलेले आहेत. जसे न्यायाधीश आपल्या निर्णयाद्वारे आरोपींना फासावर चढवतो, तशीच प्रक्रिया ॲलोपॅथिक चिकित्सा विज्ञानाद्वारा घडत आहे.

आज भारतासहित संपूर्ण जगामध्ये मृत्यूचे सर्वांत मोठे कारण हार्ट अ‍ॅटॅक अथवा अपघात नसून उपचारादरम्यान दिली जाणारी अ‍ॅलोपॅथिक औषधे आहेत हे Dr. Restrain यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे.

डॉक्टर व हॉस्पिटल हे समाजाच्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत, ही कल्पनाच मुळी मूर्खपणाची आहे. जोपर्यंत प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या आरोग्याची काळजी व जबाबदारी स्वतः घेणार नाही, तोपर्यंत डॉक्टर व हॉस्पिटल काहीच करू शकणार नाहीत. इतर कोणत्याही कारणापेक्षा औषधांच्या दुष्परिणामांनी मरणाऱ्यांची संख्या पाचपट जास्त आहे असे -Dr. B. M. Hegde (पद्मभूषण ) MD, FRCP (London) म्हणतात.

अ‍ॅलोपॅथिक चिकित्साविज्ञानापेक्षा आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, अ‍ॅक्युप्रेशर Homiopathy इत्यादी चिकित्सापद्धती अधिक श्रेष्ठ आहेत. टेक्नॉलॉजीचा उपयोग करून अ‍ॅलोपॅथीला वरचढ सिद्ध करणे, ही समाजाची अक्षम्य दिशाभूल आहे.

लोकांना असे वाटते की, अ‍ॅलोपॅथिक चिकित्साविज्ञान हे ज्ञान व प्रक्रियांचे सुव्यवस्थित क्षेत्र आहे; परंतु हा केवळ एक भ्रम आहे. हे अत्यंत अपूर्ण व अनेक दोषांनी युक्त विज्ञान आहे. ऑपरेशन व उपचारादरम्यान मानवी शरीरात घडणाऱ्या जैव-रासायनिक प्रक्रिया इतक्या धोकादायक व अनिश्चित असतात की, त्यामुळे मृत्यू झाल्यास आश्चर्य वाटायला नको असे - डॉ. अतुल गावंडे (HOD, बोस्टन युनिव्हर्सिटी, अमेरिका, सर्जरी डिपार्टमेंट) म्हणतात.

हेल्थ चेकअपच्या नावाने एक जबरदस्त व्यापार व भ्रष्ट व्यवस्था अस्तित्वात आहे. लोकांना असं वाटत असेल की, पृथ्वी वर जिवंत राहण्यासाठी अ‍ॅलोपॅथिक चिकित्सा/औषधी /रक्त-लघवी तपासण्या, हायटेक सर्जरी व टेक्नॉलॉजी आहे, तर हे साफ चुकीचे आहे. डॉ. हेगडे येथे नमूद करतात की, देवाची कृपा आहे की, हे अ‍ॅलोपॅथिक चिकित्साविज्ञान १००-१५० वर्ष जुने आहे. त्यामुळे मानवजात अजून पृथ्वी वर जिवंत आहे.

मानवी प्रतिकारक्षमता किंवा आजार ठीक करण्याची अंगभूत क्षमता यांवर अ‍ॅलोपॅथिक डॉक्टरांचा विश्वास नाही. चिकित्साजगतातील व्यापारीकरणामुळे लोकांचा विश्वास डॉक्टरांवरून उडत चाललेला आहे. वेळीच पैसा व चिकित्सा जर वेगळी केली गेली नाही, तर समूळ मानवजात धोक्यात येईल इतका हा जीवघेणा उद्योग झालेला आहे. टेक्नॉलॉजीमुळे चिकित्सेला बाजाराचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

हृदयरोग व कॅन्सर यामध्ये सर्वाधिक टेक्नॉलॉजीचा वापर केला जातो. हे दोन विभाग प्रचंड पैसा कमविण्याचे साधन बनले आहेत. बायपास, कॅन्सर, अ‍ॅपेंडिक्स, मणक्याचे ऑपरेशन, सिझेरिअन, गर्भाशय काढण्याचे, कृत्रिम गुडघेरोपणाचे अशी ऑपरेशन गरज नसतांना सर्रास केले जाणारे व त्याद्वारे प्रचंड पैसा उकळण्याचे साधन बनली आहेत.

अ‍ॅलोपॅथिक चिकित्सापद्धती निदाना-(dignosis) च्या बाबतीत अचूक आहे असे म्हटले जाते, परंतु हासुद्धा एक भ्रम आहे. त्यात चलाखी, कृत्रिमपणा अधिक असतो. Dr. Jecob Kuriyan यांनी ही निदानाची प्रक्रिया अचूक असूच शकत नाही, हे आपल्या पुस्तकात सिद्ध केले आहे.

संपूर्ण देशवासीयांपुढे या अतिशय भ्रष्ट अ‍ॅलोपॅथिक चिकित्साव्यवस्थेशी कसे लढावे, हा यक्ष-प्रश्न आहे. डॉक्टर व हॉस्पिटलना देशातील सर्व कायदे संरक्षण देतात. रुग्णांच्या अगतिकतेचा व अज्ञानाचा फायदा घेऊन सर्व प्रकारचे भ्रष्ट आचरण करणाऱ्या व साळसूदपणे समाजामध्ये राहणाऱ्या या व्यवस्थेचे काय करावे, हा खरा प्रश्न आहे.

टाइम्स ऑफ इंडियाच्या एका संपादकीय लेखामध्ये २९/०९/२००७ रोजी 'डॉक्टर इन मेडिसिन' या मथळ्याखाली असे म्हटले आहे की-पोलीसव्यवस्थेनंतर सर्वांत महाभ्रष्ट व्यवस्था कोणती असेल, तर ती आपल्या देशातील आधुनिक चिकित्सा व मेडिकल व्यवस्था आहे. आता इतक्या वर्षांत ती बहुधा क्रमांक एकची झाली असेल, यात शंका नाही. समाजातील सर्वांना याचा अनुभव आलेला असूनही सर्व सुज्ञ लोक व शासन याबाबत आत्मघातकी मौन बाळगून आहेत.

अनावश्यक रक्त-लघवी तपासणी, Xray, सोनोग्राफी, सीटी स्कॅन, MRI, एन्डोस्कोपी अँजिओग्राफी इत्यादी अनेक तपासण्या करण्यासाठी रुग्णांना बाध्य केले जाते. यापैकी ९०% तपासण्यांची रुग्णांना गरज नसते. डॉक्टर स्वतः आपला अनुभव व कौशल्याच्या आधारे योग्य निदान करू शकतात, जे शेकडो तपासण्यांपेक्षा जास्त अचूक असू शकते, या तपासण्यांमागे ५०% पर्यंत कमिशन मिळते, हे आमीर खानने सत्यमेव जयते या टीव्ही कार्यक्रमात जगजाहीर केले आहे. यात काही अपवाद नसतील, असे नाही.

अनावश्यक व्हॅक्सिनेशनचा धंदाही फार जोमात आहे. लसीकरण करतांना BCG, POLIO, TRIPLE, MMR, MISELS, THYROID इत्यादी लसी वगळता अनेक लसी अनावश्यक असून या लसींची विश्वासार्हता आपल्या देशात अगदीच कमी आहे. औषधी कंपन्या लसीकरणाच्या नावाने अब्जावधी रुपयांचा नफा कमवितात. मेडिकल सायन्सच्या इतिहासात लाखो लोकांचा बळी या अनावश्यक लसीकरणामुळे गेला आहे. लसीकरणामुळे आजार जातात, हा भ्रम आहे.

औषधी कंपन्या आपली औषधं लिहावीत म्हणून डॉक्टरांना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, भेटवस्तू, विदेश दौरे प्रायोजित करतात. रुग्णांना जास्तीत जास्त औषधे लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. अनावश्यक औषधांच्या दुष्प्रभावामुळे रुग्णाच्या शरीरावर घातक दुष्परिणाम होऊन रुग्णाचा जीव व पैसा दोन्हीवर गदा येते. रुग्ण मात्र याबद्दल अनभिज्ञच राहतात.

असाच भ्रष्टाचार मोठ्या कॉर्पोरेट हॉस्पिटलनी अवलंबलेला असून त्यात अनावश्यक ऑपरेशनची मालिकाच आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात पैसा मिळत असल्यामुळे अनेक ऑपरेशनचा दुरुपयोग सर्रास होताना दिसून येतो. खूप कमाई असल्यामुळे अनेक शहरांत सुपरस्पेशालिटी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलची साखळीच निर्माण होत आहे. मोठी कॉर्पोरेट घराणी आता या व्यवसायात उतरली आहेत.

रुग्णाचा आजार किती गंभीर आहे, हे रुग्णाच्या नातेवाइकांना अतिशय चांगल्या पद्धतीने पटवून दिले जाते (तो तसा नसतांना). त्याला विचार करायला वेळही मिळू न देता महागडी ऑपरेशन करायला भाग पाडले जाते.

असे अनावश्यक ऑपरेशन करतांना किंवा उपचार करताना रुग्ण दगावला अथवा अधिक गंभीर झाला, तर हॉस्पिटल कोणतीही जबाबदारी न घेता पैसे मात्र पूर्ण वसूल करतात. अनेक वेळा असे दिसून आले आहे की, सामान्य आजारांकरिता केलेल्या अनावश्यक ऑपरेशनमुळे रुग्णाला जीव गमवावा लागला आहे.

अशीच एक भयंकर समस्या आपल्या देशाला भेडसावत आहे. ती म्हणजे स्त्रीभ्रूणहत्या. भारतासारख्या देशामध्ये ही बाब अतिशय लाजिरवाणी आहे. ॲलोपॅथिक डॉक्टरांच्या सहभागाशिवाय हे पाप घडूच शकत नाही. संपूर्ण देशातील सामाजिक व्यवस्था वेगाने ढासळत आहे. स्त्री-पुरुष गुणोत्तर लक्षणीयरीत्या घटत आहे. सरकारी कायदे, सर्वोच्च न्यायालय, सामाजिक संस्था व प्रत्यक्ष मा. पंतप्रधान यांनी गंभीर विधाने करूनही डॉक्टर थांबायला तयार नाहीत.

अनेक शासकीय योजनांमधून रुग्णांचे हजारो कोटी रुपये वसूल केले जातात. किडणीचोर डॉक्टरांच्या कुकृत्यांमुळे देशाला अनेक वेळा व्यथित व्हावे लागले आहे. डॉक्टरांच्या निष्काळजी वर्तनामुळे अनेक रुग्णांना प्राण गमवावे लागले आहेत.

व्यवस्थेच्या मुळापर्यंत पसरलेला हा भ्रष्टाचार थांबवणे शासकीय यंत्रणेला शक्य नाही, कारण त्याच भ्रष्टवृत्तीने ही यंत्रणाही किडलेली आहे. स्वतःचे स्वास्थ्य अबाधित राहील अशा आरोग्यदायी सवयी सर्वांनी आत्मसात करायला हव्यात, हेच याला चोख प्रत्युत्तर ठरेल.

संकलक
विजय आठल्ये


**कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास हार्दिक शुभेच्छा!**

आयुर्वेद, होमिओपॅथी, पर्यायी उपचारपद्धती यासंबंधी दोनशे पुस्तकांचा संग्रह
तसेच माहितीचे संकलन उपलब्ध
विविध विकारांसाठी उपयुक्त माहितीचे संकलन पाठवू.

**राज्य सरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी,**
**शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना निवृत्ती वेतन विषयक सर्व समस्यांवर**
**मार्गदर्शन मिळेल.**

५०/- रुपयांच्या पोस्टेजसह पत्रव्यवहार करा.

# अरविंद द. दीक्षित

निवृत्त शिक्षण उपसंचालक व निवृत्ती वेतनविषयक मार्गदर्शक,
विविध ज्ञानशाखा अभ्यासक

**शुभ दीपावली!**

*** संपर्क ***
२६, संयुक्त महाराष्ट्र हाउसिंग सोसायटी,
राजारामपुरी, १३ वी गल्ली, दीपा गॅस एजन्सीजवळ, कोल्हापूर ४१६००८
फोन ०२३१-२५३०७१६, मो. ९६२३१ १०८८६

# मंत्रोच्चारातील शुद्ध अक्षर उच्चाराचे प्राचीन शास्त्र

लिहिणे, वाचणे व बोलणे हे नेहमी शुद्ध असावे.... कारण शब्द हे मंत्ररूप असतात ...

**।। अमंत्रस्य नास्ति अक्षरम्।**

**नास्ति मूलम् अनौषधम्....।।** म्हणतात ते खरंच आहे....

मराठी मुळाक्षरे आणि आरोग्य-

थोडक्यात, Word Vibration Therapy

शब्दक्षमता बघायची आपल्या शरीरात सात चक्रे आहेत. त्या चक्रांना वेगवेगळ्या संख्येच्या पाकळ्या आहेत. त्या पाकळ्या शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांना जोडलेल्या आहेत. प्रत्येक पाकळीला एकएक बीजाक्षर आहे. बीजाक्षरे म्हणजे मराठीतील एकएक मुळाक्षर आहे. ही अक्षरे एकएक अक्षर अनुस्वार देऊन बऱ्याच वेळा म्हटल्यास त्या उच्चाराच्या कंपनाने (व्हायब्रेशनने) तो अवयव नीट काम करू लागतो आणि आपले आरोग्य सुधारते.

एकाला दोन दिवस शौचास झाली नव्हती. रंगकिरण चिकित्सा, चुंबक चिकित्सा करूनसुद्धा फायदा झाला नव्हता. मी २५-२५ वेळा वं शं षं सं बं भं मं यं रं लं ही अक्षरे अनुस्वार देऊन म्हणायला सांगितली. तसे केल्यावर त्याला ओटीपोटात हालचाल जाणवली आणि तासाभराने कॉल आला व एकदाचे पोट रिकामे झाले.

लहान मुलांना शू-शी व्हावी म्हणून आपल्याकडे मोठी माणसे शू-षू म्हणतात व मुलाला लघवी/ शौच होते. लहान मुलाचे शरीर अतिशय कोवळे व नाजूक असते, त्यामुळे ह्या बीजाक्षरांच्या दुसऱ्याने केलेल्या उच्चारांच्या कंपनांचाही परिणाम होतो.

साताऱ्यात एका बाईंना छातीत दुखले तर 'ठं' म्हणा असे सांगितले. त्या म्हणाल्या- अहो, लक्षात कसे ठेवायचे? मी म्हटले, विठ्ठल म्हणा. ही चर्चा येथेच संपली. दोन दिवसांनी त्या बाईंच्या छातीत दुखले. त्या वेळी त्यांना आठवला तो चर्चेतला विठ्ठल! नुसते विठ्ठल-विठ्ठल म्हणू लागल्या आणि पुन्हा स्वस्थ झाले

एका आजींना (वय ७३) संडासला त्रास, त्यामुळे गॅसेसचा असा त्रास होता. डॉक्टरांच्या मते, आतड्यांना वयोपरत्वे शिथिलता आली. त्यांना मूलाधार व स्वाधिष्ठानची अक्षरे म्हणावयास सांगितले. त्या म्हणाल्या, ही अक्षरे लक्षात कशी ठेवायची? म्हणून त्यांना 'बं भोले नमः शिवाय' म्हणण्यास सांगितले. (यामध्ये मूलाधार व स्वाधिष्ठानची बरीच अक्षरे येतात) आठ दिवसांत चांगला फरक पडला.

डोंबिवलीच्या एका बाईंचा फोन शनिवारी संध्याकाळी आला. 'मला गेले १५-२० दिवस जुलाब होत आहेत. पोटात दुखते आहे, मूलाधार, स्वाधिष्ठान व मणिपूर चक्राची अक्षरे ५०-५० वेळा म्हणा, असे सांगितले.

पूर्वी आपल्या मुलांकडून बाराखड्या म्हणून घेतल्या जात असत. त्याचा एक उद्देश आरोग्य हाही असावा. हल्ली इंग्रजी मीडियमध्ये शिकणाऱ्या मुलांनी मराठी मुळाक्षरे म्हणणे पालकांना कमीपणाचे वाटते!!

आमच्या पूर्वजांनी निसर्गातल्या शक्तींचा अभ्यास करून माणसाला निरोगी राहण्यासाठी सहज सोपे उपचार (ज्यात वैद्याला व डॉक्टरला पैसे मिळत नाहीत) दिले. त्यांना आम्ही जुनाट, अडाणी म्हणतो. अशास्त्रीय (पाश्चात्त्य लोकांना मान्य नाही असे) म्हणतो.

मराठीतील अक्षरे कोणीही, कुठेही म्हटली तरी चालतात. विश्वास ठेवून अथवा न ठेवता मराठीतील मुळाक्षरे म्हणण्याचा प्रयोग करून पाहावा. माझ्या अनुभवाप्रमाणे एक अक्षर १०० वेळा म्हणायला एक मिनिट पुरते. बऱ्याचशा आजारांत मुलाधार, स्वाधिष्ठान व मणिपूर चक्राची अक्षरे १०० वेळा म्हणणे पुरते.

मूलाधार चक्राची अक्षरे -

**वं, शं, षं, सं**

स्वाधिष्ठान चक्राची अक्षरे -

**बं, भं, मं, यं, रं, लं**

मणिपूर चक्राची अक्षरे -

**डं, धं, णं, तं, थं, दं, धं, नं, पं, फं**

अनाहत चक्राची अक्षरे-

**कं, खं, गं, घं, चं, छं, जं, झं, टं, ठं**

विशुद्ध चक्राची अक्षरे-

**अं, आं, इं, ईं, उं, ऊं, ऋं, ॠं, एं, ऐं, ओं, औं, अं, अः**

आज्ञा चक्राची अक्षरे-

**हं, क्षं**

**संकलन - अनिकेत पाध्ये**

# दिवाळीचं बदलतं स्वरूप...

दिवाळी म्हणजे दिव्यांचा सण. दीप म्हणजे दिवा. दिवा हा प्रकाशाचा दूत किंवा अंधाराचा वाहक. अशा ह्या दिव्यांच्या अनेक रांगा एकत्र आल्या की, अंधाराचा नाश होणारच. वास्तविक उगवणारा प्रत्येक दिवस रात्रीच्या अंधाराचा नाश करीतच उदयाला येतो. दिवस-रात्रीचा, अंधार-प्रकाशाचा, सुख-दुःखाचा हा खेळ चालूच असतो अव्याहतपणे. खेडच्यापाडच्यांपासून ते अगदी महानगरांपर्यंत एकाच वेळी साजरा होणारा आणि लहानपणापासून अगदी वृद्धांपर्यंत सर्वांना हवाहवासा वाटणारा हा सण आहे. खरे तर दिवाळी हा रोषणाईचा, वातावरणातील अंधाराचे वर्चस्व दूर करणारा सण आहे. पण अशी अगणित घरे असतात की, काही दुर्घटनांच्यामुळे त्यांच्या घरी कायमचा अंधारच आहे. आता उदाहरणच द्यावयाचे झाले तर किल्लारी येथील भूकंप, माळीण गावातील भूस्खलन, जम्मू-काश्मीर, उत्तराखंडमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी झालेली ढगफुटी आणि पावसाचे रौद्र रूप, पाकिस्तान आणि चीनच्या सीमांवर देशाचे रक्षण करतांना शहीद झालेले असंख्य जवान अशा अनेक घटना सांगता येतील. ह्या सर्व गोष्टींकरिता देशाचे सरकार आणि देशवासीयांनी भरपूर आर्थिक मदत केली. पण त्यांच्या मनातील किंवा हृदयातील अंधार कितपत दूर होऊ शकेल, ह्याबाबत शंकाच आहे. या सर्वांसोबत वाढत्या महागाईचा भस्मासुर, कुठे अतिवृष्टी तर कुठे भीषण दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्त्रियांवर होणारे अत्याचार, वाढता जातीयवाद इत्यादी अनेक प्रश्न दर वर्षी येणाऱ्या दिवाळीचे स्वरूपच बदलवून टाकत आहे.

दिवाळीचे शुभ पर्व आनंद, उत्साह वाढविणारे आहे, द्विगुणित करणारे आहे. मंगलमय अशी ही दिवाळी अंधारातून प्रकाशाकडे आगेकूच करण्याची आशा-उमेद निर्माण करत असते. आपल्या आजूबाजूचा परिसर विविध समस्यांनी घेरलेला आहे. अनाचार, सत्तालोलुपता, बुवा-बाबांचे वाढते प्रस्थ, दहशतवाद, देशांतर्गत वादविवाद अशा अनेक गोष्टींनी सामान्य जनतेचं जगणं कठीण झाले आहे. बळीराजा हा अस्मानी आणि सुलतानी संकटांनी त्रस्त आहे. ही सर्व संकटे असूनही सर्वसामान्य माणूस 'अच्छे दिन' येण्याच्या आशेवर आहे. दिवाळीप्रमाणे संकटेदेखील नियमितपणे दर वर्षी येतात, पण कितीही संकटे आली तरी दिवाळी दर वर्षी अधिकाधिक उत्साहाने साजरी केली जात आहे. दिवाळी साजरी करण्याच्याा उत्साहावर कोणतेही संकट पाणी टाकू शकले नाही, शकत नाही. प्रगतीच्या ह्या विज्ञानयुगात नवे शोध लावले गेले, माणूस परग्रहावर जाऊन आला, माहिती आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर संपूर्ण जग जवळ आणले; पण खंत एकाच गोष्टीची आहे की, त्याला सुसंवादाची पातळी गाठता आली नाही. काळ बदलत गेला तसा माणसाने स्वतःच्या विचारात, वागण्यात बदल केला. काळानुरूप कदाचित हीच योग्य पद्धत असेल.

आपण शहरी भागात राहतो. रोजचे कामावर जाणे, येणे, गर्दी, धूर, प्रदूषण, गोंगाट, कोलाहल या सर्व गोष्टींमुळे अतिशय त्रासलेले असतो. ह्याला कारण म्हणजे वाहनांची झालेली अनियंत्रित वाढ आणि जीव गुदमरून टाकणाऱ्या धुराचे प्रदूषण. अशातच दिवाळी आली की अथवा लग्नाची वरात, मिरवणूक इत्यादी प्रसंगी काहीही कारण असो अथवा नसो- उडविल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या आवाजाने निसर्गात जे काही लहानसहान पक्षी, जीवजंतू राहिले आहेत ते घाबरून हकनाक बळी जात आहेत. फटाके फुटल्यानंतर होणाऱ्या कचऱ्याबद्दल तर बोलायलाच नको. त्यातूनही मन अतिशय उदास होते ते लक्ष्मीपूजनाच्या दिवशी. लक्ष्मीमातेचे चित्र असणारे फटाके फोडून त्या चित्रांच्या चिंधड्या जेव्हा आपल्या नजरेला दिसत असूनही पायाखाली तुडविल्या जातात. म्हणजे किती हा विरोधाभास! सरकारी यंत्रणा वेळोवेळी सर्वसामान्यांच्या हितासाठी बरेच कायदे बनवते; पण अशिक्षितांच्या सोबत उच्चशिक्षित, गरीब, श्रीमंत सर्वच जण नियम, कायदे माहित असूनदेखील त्याकडे त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करतांना दिसतात. आजारी, लहान मुले, वृद्ध ह्यांना होणाऱ्या त्रासाकडे अजिबात लक्ष दिले जात नाही. त्यामुळे आपल्याला सुजाण नागरिक म्हणवून घेण्याचा अधिकार आहे की नाही, याबाबत शंकाच आहे. ठार बहिरे करणारे कर्णकर्कश फटाके उडविण्यात काहीच अर्थ नाही. प्रदूषण आणि तापमानवाढीचे दुष्परिणाम सर्वांना माहीतच आहेत. तरीपण पुन्हा एक वेळा स्वतःला व

पान १६ वर...

पान १५ वरून

### दिवाळीच बदलतं स्वरुप

येणाऱ्या पिढीला सावध करणे आवश्यक आहे. निसर्गाकडून वारंवार मिळणाऱ्या संकेतांकडे दुर्लक्ष करणे आता उज्ज्वल भविष्यासाठी कोणालाच परवडणारे नाही. या दुष्परिणामांना दूर ठेवण्यात आपण यशस्वी झालो, तर परदेशी बनावटीचे आकाशदिवे, फटाके, मेणाच्या पणत्यांचा वापर कमी आपोआप होईल आणि आपल्या बाजारपेठांमध्ये घुसखोरी करणाऱ्या शेजारी देशांवर वचक बसेल.

दिवाळीच्या निमित्ताने होणारे जास्तीचे खर्च आपण एखाद्या खऱ्या गरजूला मदत करण्यात वापरू शकतो. एखाद्या वृद्धाश्रमातील लोकांना किंवा गरीब विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी वस्तू देऊन त्यांना मदत करू शकतो. त्यांच्याशी गप्पागोष्टी करून आपण त्यांचा आणि आपला आनंद द्विगुणित करू शकतो. ही गोष्ट तशी फारच साधी आणि सोपी आहे. कुणालाही अशक्य वाटेल असे यात काहीच नाही. त्यामुळे समाजात उपेक्षित घटक नाही, ही जाणीव होईल. हा आनंद सर्वांकरीता अवर्णनीय असेल. तेव्हाच खरी दिवाळी साजरी करण्याचे समाधान मिळेल. म्हणून ज्ञानसमृद्ध आणि कृतिशील अशी, माणसाला माणूसपण देणारी दिवाळी प्रत्येकाच्या मनात मानवतेचा दीप प्रज्वलित करेल, अशी आशा करू या.

श्रीपाद टेंबे, पुणे
मो. ९१५८० ८८०४२

***

शुभ दीपावली

## स्वप्नसुंदरीस...

मानवी जीवनात स्त्री-पुरुष परस्पराकर्षण ही मानववंश-सातत्य अव्याहत चालू राहावे यासाठी निसर्गाने केलेली योजना असावी. या आकर्षणाच्या अनुषंगाने मानवाला प्रणयरंग व कामजीवन यांचा लाभ होत असतो. तन-मन रिझवणारे हे आकर्षण म्हणजे निसर्गाची रम्य किमयाच होय! एरवी जीवन नीरस झाले असते. यौवनकाळांत-विशेषतः तरुण तरुणींमध्ये परस्पराविषयी तीव्र ओढ निर्माण होते. तर सर्वसाधारणपणे कुठल्याही वयाच्या पुरुषाच्या मनात एखाद्या सुंदरीच्या सहवासाची आणि स्त्रीच्या मनांत एखाद्या उमद्या, राजबिंड्या, देखण्या पुरुषाच्या सहवासाची सुप्त अभिलाषा निर्माण होणे नैसर्गिक व स्वाभाविकच होय! आणि 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' या न्यायाने पुरुषाला स्वप्नात निखळ मैत्रीसाठी सुंदर ललना भेटली तर- हरखून जाऊन तिच्याविषयीच्या त्याच्या चित्तवृत्ती कशा बहरतात पहा....

हे कोमलांगी, तवरूप सुखवी तृप्ती न लाभे परी लोचना।
भाळी तुझ्या मृदु कुंतलांची लडिवाळ क्रीडा खुले आनना।
नेत्रींचे तव रमणीय भाव मुग्ध करिती नयना मना।
हे कटाक्ष विभ्रम किती स्मितहास्य हरवी देहभाना ।।१।।

हे गौरांगने, तव दिव्य कांती पाहून व्हावे सुवर्णही लज्जित।
वाणी तुझी चतुर मधुरा शब्द हो मज श्रवणीं अमृत।
तू बोलता जिवणी तव नाजुक करी चित्त मम विचलित।
मोहक तू हसता विलग अधरीं मौक्तिकावली शुभ्र दंत ।।२।।

हे मोहिनी, कमनीय बांधा तव चाल डौल जणू नृत्यांगना।
स्पर्शे तुझ्या उठत रोमांच ही अनुभूती की पाही स्वप्ना।
हे प्रियसखे, लावण्यवती तू रसिक मी रूप रसपाना।।
हे देवते, तव उपासक भक्त करी मी जाण ही आराधना।।३।।

आसक्त जरी मी तव रूपविभवीं नसे मम मनीं वासना।
तू स्वभावे ऋजु लाघवी जी तव संगतीची मज कामना।
स्वप्नातली सुंदरी तू अस्पर्श जरी उत्सुक मी मीलना।
प्रत्यक्ष दर्शन न कधी संभवे हुरहूर दाटे मनी वेदना ।।४।।

वि. पां. गुर्जरपाध्ये
तळेगाव (दाभाडे) मो. ८६९८७ १५८६५

मंदिरांचे अंतरंग

# पद्मनाभस्वामी मंदिर

– श्री. वा. गुर्जर, पुणे.

श्री पद्मनाभस्वामी मंदिर अर्थात केरळ येथील तिरुवनंतपुरम् मंदिर होय.

भगवान देव पद्मनाभस्वामी म्हणजे विष्णू. आर्किटेक्चरल शैली आणि संस्कृती द्रविडी आर्किटेक्चर (कोविल) प्रकारची आहे.

पद्मनाभस्वामी मंदिर हे भारतातील केरळ राज्यात तिरुवनंतपुरम् येथे स्थित विष्णूचे प्रसिद्ध हिंदू मंदिर आहे. भारताच्या मुख्य वैष्णव मंदिरांमध्ये समाविष्ट असलेले हे ऐतिहासिक मंदिर तिरुवनंतपुरम्मधील अनेक पर्यटनस्थळांपैकी एक आहे. विष्णुभक्तांच्या पूजेसाठी पद्मनाभस्वामी मंदिर एक महत्त्वाचे स्थान आहे. मंदिराच्या संरचनेत सुधारित कामे केली गेली आहेत.

इ.स. १७३३ मध्ये त्रावणकोरचे महाराजा मार्तंड वर्मा यांनी हे मंदिर पुन्हा बांधले. पद्मनाभस्वामी मंदिराशी संबंधित एक पौराणिक कथा आहे. असा विश्वास आहे की– विष्णुदेवांची जागा प्रथम या ठिकाणाहून मिळाली होती, त्यानंतर हे मंदिर त्याच ठिकाणी बांधले गेले होते. मंदिराच्या अभयारण्यामध्ये भगवान विष्णूची विशाल मूर्ती आहे. हजारो भक्त इथे खूप दूरहून येतात. भगवान विष्णू शेषनागवर शयन पोजमध्ये बसलेली ही मूर्ती आहे. असा विश्वास आहे की, तिरुवनंतपुरम्चे नाव अनंत नावावरून ठेवले गेले आहे. येथे भगवान विष्णूच्या विश्रांती मंदिराला 'पद्मनाभ' म्हणतात आणि या स्वरूपात वर्धन भगवान हे पद्मनाभस्वामींच्या नावाने प्रसिद्ध आहे.

केरळच्या प्रसिद्ध धार्मिक स्थळांपैकी एक तिरुवनंतपुरम् येथील पद्मनाभस्वामी मंदिर आहे. केरळ संस्कृती आणि साहित्य यांचा एक अद्वितीय संगम आहे. एकीकडे सुंदर समुद्रकिनारा आहे आणि दुसरीकडे पश्चिम घाटांच्या टेकड्यांचे सुंदर नैसर्गिक सौंदर्य आहे. या सर्व अमूल्य नैसर्गिक स्रोतांमध्ये पद्मनाभस्वामी मंदिर. मंदिराच्या बांधकामाची वास्तुकलादेखील सुरेख आहे. उत्कृष्ट कारागिरीचा नमुना आहे. मंदिरात सूर्यप्रकाशाचा वापर केला जातो आणि शंख फुंकले जातात. मंदिराचे वातावरण मोहक आणि सुवासिक राहते. मंदिरामध्ये एका सुवर्ण स्तंभाचाही समावेश आहे. मंदिराच्या कॉरिडॉरमध्ये



अनेक स्तंभ उभे केले गेले आहेत, जे उत्कृष्टरीत्या सुशोभित केलेले आहेत. ज्यामुळे मंदिराच्या वैभवात भर पडते.

मंदिरात प्रवेश करण्यासाठी पुरुषांनी धोती घालणे आणि स्त्रियांसाठी साडी नेसणे अनिवार्य आहे. या मंदिरात केवळ हिंदूच प्रवेश करतात. मंदिरात दर वर्षी दोन महत्त्वाचे उत्सव आयोजित केले जातात, ज्यापैकी एक मार्च व एप्रिल महिन्यांत आणि दुसरा ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात साजरा केला जातो. मंदिराच्या वार्षिक उत्सवांत; भक्त, लाखोंच्या संख्येने सहभागी होतात आणि भगवान पद्मनाभस्वामींकडून शांततेची इच्छा बाळगतात.

पद्मनाभस्वामी मंदिर राजा मार्तंड यांनी बांधले होते. या मंदिराच्या पुनर्बांधणीत अनेक महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेतली गेली आहे. सर्वप्रथम, त्याच्या भव्यतेच्या आधारे हे मंदिर मोठ्या रचनेत बांधले गेले आहे. त्याचे शिल्पसौंदर्य सर्वांना प्रभावित करते. द्रविडी आणि केरळी शैलीचा प्रभाव मंदिराच्या बांधकामात दिसतो. मंदिराचे गोपुर द्रविड शैलीत बनलेले आहे. पद्मनाभस्वामी मंदिर दक्षिण भारतीय वास्तुकलेचे एक अद्भुत उदाहरण आहे.


मंदिर परिसर अतिशय विशाल आहे, सात मजली उंच आहे. गोपुरम कला सुसज्ज आहे. मंदिराजवळच सरोवर आहे, ज्याला 'पद्मशृथ कुलम्' असे म्हणतात. हे मंदिर आणि त्याच्या मालमत्तेचे स्वामी भगवान पद्मनाभस्वामी आहेत. बऱ्याच वर्षांपासून हे मंदिर आणि त्याच्या मालमत्तेची देखभाल आणि तिचे रक्षण ट्रस्टमार्फत होते. त्याचे अध्यक्ष त्रावणकोरच्या राजपरिवाराचे सदस्य होते. परंतु सध्या सुप्रीम कोर्टाने राजाच्या कुटुंबाला या मंदिराचे व्यवस्थापन करण्यापासून रोखले आहे. दि. १२ जून २०११ रोजी सुप्रीम कोर्टाने पुरातत्त्व विभागाचे अधिकारी व फायर ब्रिगेड यांना मंदिराच्या तळघरातील बंद असलेल्या खोल्या उघडण्यास सांगितले आणि त्यांच्यातील वस्तूंचे निरीक्षण केल्यावर असे लक्षात आले की, या परिसरात सुमारे दोन लाख कोटींची संपत्ती आढळली आहे. तळघर–बी अद्याप उघडले गेले नाही. कारण सर्वोच्च न्यायालयाने हे तळघर उघडण्यास बंदी घातली आहे. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे की मंदिराशी संबंधित सर्व मालमत्तेची व संरक्षणाची जबाबदारी सरकारची आहे.

# समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता

कोकणातील समुद्रकिनारे हे तिथे येणाऱ्या पर्यटकांचे सर्वांत मोठे आकर्षण आहे. विस्तीर्ण समुद्रकिनारा हा पर्यटनाच्या दृष्टीने नैसर्गिक वरदान असला, तरी या किनाऱ्याचे जतन व संवर्धन करण्यात गावोगावची माणसे कमी पडताहेत. त्यामुळे गेल्या काही वर्षांत यापैकी अनेक समुद्रकिनाऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. जागोजागी पसरलेल्या प्लॅस्टिकच्या रंगबेरंगी पिशव्या, दारू-बिअरच्या बाटल्या, कागदाचे तुकडे, निर्माल्य आदी अनेक टाकाऊ वस्तू आणि कचऱ्याचे सर्वत्र 'साम्राज्य' आहे. त्याचा भविष्यात पर्यटनव्यवसायावर दुष्परिणाम होणार आहे. मात्र या संकटाला सामोरे जावे लागू नये याकरिता कोकणपट्टीतील जी काही थोडी मंडळी वा संस्था प्रयत्नशील आहेत; त्यात रेवदंडा येथील 'ज्येष्ठ नागरिक संघा'चा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

ज्येष्ठांच्या या संस्थेतर्फे रेवदंड्यात विविध लोकोपयोगी उपक्रम वर्षभर राबविले जातात. त्यापैकी 'समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता' हा एक प्रमुख उपक्रम असून रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थांच्या सहभागाने तो गेली बारा वर्षे सातत्याने राबविला जात आहे. या उपक्रमाबद्दल संस्थेला राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

दूरचित्रवाणीचा प्रसार घरोघरी झाल्यामुळे आता सर्वसामान्य माणसालाही परदेशातील स्वच्छ, सुंदर आणि नितळ समुद्रकिनाऱ्यांचे दर्शन होऊ लागले आहे. त्या तुलनेत आपल्याकडील समुद्रकिनारे तेवढेच सुंदर असले तरी स्वच्छतेच्या बाबतीत आपण त्यांच्या पासंगालाही नाहीत, हे सत्य कोणीच नाकारू शकत नाही. आजही अनेक ठिकाणी नैसर्गिक विधीसाठी समुद्रावर जाण्याची प्रथा रूढ आहे. सरकारची हागणदारीमुक्त गावाची योजना त्या ठिकाणी अपयशी ठरली आहे. समुद्रकिनारे कचरा फेकण्याची जागा झाली आहे, तर अनेक ठिकाणी तेथे अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहे.



ही परिस्थिती केवळ कोकण किनाऱ्यावरच आहे असे नाही, ती भारतात सगळ्याच किनारपट्ट्यांवर आहे. पण महाराष्ट्रातील किनाऱ्यांची दुर्दशा जास्त लक्षणीय आहे. त्यामुळेच समुद्रकिनारे हे कोकणच्या पर्यटन विकासाचा प्राण आहेत, याकडे डोळेझाक करून चालणार नाही.

एकीकडे नागरिकांकडून समुद्रकिनाऱ्यावर मानवी अतिक्रमणे होत असतानाच गेल्या काही वर्षांत समुद्रामध्ये जहाजे बुडून तेलगळतीच्या घटना घडून सागरसंपत्ती आणि तटवर्ती भूप्रदेशाचा पर्यावरणीय ऱ्हास होत आहे. काही वर्षांपूर्वी मुंबईनजीक एम. व्ही. खलिजी आणि एम. एस. सी. चित्रा ही दोन जहाजे परस्परांवर आदळून झालेल्या तेलगळतीमुळे मुंबई व रायगड जिल्ह्यात कांदळवनाची, सागरी किनाऱ्याची आणि जीवसृष्टीची अपरिमित हानी झाली. त्यानंतर एम. व्ही. रॅक बुडाल्यामुळे तसेच विस्डम आणि त्यानंतर पॅव्हीट ही दोन जहाजे समुद्रात भरकटत आल्यामुळे झालेली तेलगळती समुद्रकिनाऱ्यांचे नुकसान करून गेली. त्यामुळे सरकारी यंत्रणांनी अशा वारंवार घडणाऱ्या घटनांवर नियंत्रण, प्रतिबंध व कडक उपाययोजना अमलात आणल्या नाहीत; तर एक दिवस कोकणच्या किनारपट्टीचे सौंदर्यच नष्ट झाल्याचे हताशपणे पाहावे लागेल.

ठाणे जिल्ह्यातील केळवा-माहिम, बोर्डी, डहाणू, अर्नाळा; रायगड जिल्ह्याच्या श्रीवर्धन, श्रीहरिहरेश्वर, अलिबाग, मुरूड-जंजिरा, काशीद, मांडवा, सासवणे, आवास, वरसोली, किहीम, रेवदंडा, अक्षी, नागाव, साळाव, बागमांडला, आगरदांडा, कोर्लई; रत्नागिरी जिल्ह्यातील वेळास, केळशी, हर्णे, मुरूड, लाटघर, बुरोंडी, गुहागर, वेळणेश्वर, गणपतीपुळे; सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग, देवगड, मालवण, निवती, भोगवे, वेंगुर्ले अशा अनेक ठिकाणचे समुद्रकिनारे पर्यटकांसाठी मौजेची स्थळे आहेत. पर्यटक प्रामुख्याने या जागी निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी जातात. मात्र

त्यातील काहींच्या अनिर्बंध व बेशिस्त वागण्यामुळे आज कोकणचा समृद्ध, निसर्गसुंदर किनारा घुसमटून गेला आहे. या समुद्रकिनाऱ्यांवर फेरफटका मारला, तर ठिकठिकाणी कचरा पडलेला दिसून येतो. ही परिस्थिती बदलावयाची असेल, तर येणाऱ्या पर्यटकांची मानसिकता बदलण्याचे प्रयत्न करावे लागतील. भविष्यात किनारे जपण्यासाठी, त्यांचे सौंदर्य टिकविण्यासाठी योग्य पर्याय निवडले नाहीत, तर पुढच्या पिढ्यांसाठी कोकणातील सुंदर पर्यटनस्थळे बघण्यालायकच राहणार नाहीत!

या पार्श्वभूमीवर, रत्नागिरीच्या लायन्स क्लबने शहरातील मांडवी किनारी राबविलेल्या एका स्तुत्य उपक्रमाची नोंद घ्यावी लागेल. गणपती विसर्जनाच्या वेळी मूर्तींबरोबर निर्माल्यही समुद्रात वाहण्याची परंपरा आहे. ते निर्माल्य लाटांबरोबर किनाऱ्यावर येऊन जमा होते. त्यात प्रामुख्याने पूजेसाठी वाहिलेली फुले, केळीची पाने, सजावटसाहित्याचा समावेश असतो. किनाऱ्यावर येणाऱ्या लोकांचे पाय या निर्माल्यावर पडतात. त्यामुळे त्याच्या पावित्र्याला धक्का पोहोचतो. त्याशिवाय किनाऱ्यावर अस्वच्छता निर्माण होते आणि तिथे फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या लोकांना दुर्गंधीचा त्रास होतो. या निर्माल्याचे पावित्र्य राखण्याच्या उद्देशाने आणि किनारा स्वच्छ करण्यासाठी लायन्स क्लबने मांडवी किनारा स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत गोगटे-जोगळेकर महाविद्यालयातील एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीनेच रोटरी क्लब ऑफ रत्नागिरी, स्वराज्य मित्र मंडळ (पेठ किल्ला), संकल्प कला मंच, आभार, कोकण मराठी साहित्य परिषद, नवनिर्माण महाविद्यालय, निसर्ग सर्पमित्र संस्था, आर्ट ऑफ लिव्हिंग आदी शहरातील विविध सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, बँक ऑफ इंडियाचे निवृत्त कर्मचारी तसेच अनेक निसर्गप्रेमी मंडळी सहभागी झाली होती. रविवारी गौरी-गणपतीच्या विसर्जनाच्या दिवशी मांडवी किनारी शहरातील शेकडो घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन केले गेले. त्या वेळी गणेशमूर्तींबरोबरच मोठ्या प्रमाणात समुद्रात सोडले गेलेले आणि लाटांबरोबर लागलीच मांडवी किनारी परत आलेले सर्व निर्माल्य तसेच किनाऱ्यावर साचलेला प्लॅस्टिकचा किंवा अन्य कचरा रत्नागिरीकरांनी सोमवारी सकाळी उचलून खत करण्यासाठी दूर नेला. एका अर्थी, रत्नागिरीकरांनी हा उपक्रम यशस्वी करून कोकणातील लोकांसाठी एक नवा पायंडा घालून दिला आहे.

**– सौ. मुग्धा दीक्षित**


# जी.व्ही.गणपत्ये केमोक्रॅटस् सेल्स्

**फायबरग्लास रॉ मटेरिअल,**
**इपॉक्सी रेझीन्स, पॉलीयुरेथेन रेझीन्स इपॉक्सीपुटीज (एम, सील)**
**लॅमिनेशन मटेरिअल, प्लायवुड बोर्डस**
**मिळण्याचे एकमेव ठिकाण.**

जोगेश्वरी मंदिरासमोरील गल्ली, वाघ चेंबर्स, ६४५, बुधवार पेठ, सकाळ ऑफिस जवळ, पुणे - ४११ ००२

ऑफिस (०२०) २४४५२११०, २४४५९८३४ मो. ९८२२० २४२१०

# अनोखा सारस पक्षी !

केवळ गोंदिया परिसरात आढळणाऱ्या सारस पक्ष्याचं अस्तित्व आज धोक्यात आलंय. दुर्मिळ असलेल्या सारसच्या संवर्धनासाठी गोंदियात वन विभागानं कंबर कसलीय. यासाठी खास महोत्सव आयोजित करण्यात आला असून जनजागृतीही करण्यात येत आहे. अत्यंत दुर्मिळ असलेला सारस पक्षी... महाराष्ट्रात केवळ गोंदिया जिल्ह्यातच आढळतो. सारसमुळेच गोंदियाच्या निसर्गसौंदर्याचं वेगळेपण सतत जाणवत असतं. निसर्गाचं वरदान लाभलेल्या गोंदिया जिल्ह्यात वन्य जीवांचं मोठ्या संख्येनं वास्तव्य आहे. देश-विदेशातले पक्षीही गोंदियाची सफर करण्यासाठी दर वर्षी दाखल होत असतात. मात्र सारसचं वेगळेपण सर्वांमध्ये उठून दिसतं. या दुर्मिळ सारसच्या संवर्धनासाठी जिल्हा



प्रशासनानं ठोस पावलं उचलली आहेत.

सारसचं खास वैशिष्ट्य म्हणजे हा पक्षी एकदाच आपला साथीदार निवडतो आणि आयुष्यभर त्याच्याच सहवासात राहतो. एकाचा मृत्यू झाल्यास दुसरा जोडीदारही अन्न-पाण्याचा त्याग करून मृत्यूला कवटाळतो. प्रेमाप्रति त्याची ही निष्ठा आपल्यालाही काही तरी शिकवून जाणारी आहे.

विशेष म्हणजे, सारसचा अधिवास अभयारण्यात नसून गावालगतच्या धानाच्या शेतात असतो. त्याच ठिकाणी तो एक किंवा दोन अंडी घालतो. मात्र, माणसांच्या जवळ राहणंच त्याच्या ऱ्हासाचं मुख्य कारणही ठरलंय.

सारससंवर्धनासाठी जिल्हा पर्यटन समितीनं गावा-गावात जनजागृती घडवून आणलीय. ज्या शेतांमध्ये सारसचा अधिवास आहे, त्या ठिकाणी कीटकनाशक वापरावर प्रतिबंध घालण्यात आला आहे.

गोंदिया जिल्ह्यात सध्या ३२ ते ४० च्या आसपास सारस आहेत. ही संख्या शेकडोंवर जाण्यासाठी १५ डिसेंबर ते ३० जानेवारीदरम्यान गोंदिया जिल्ह्यात सारस महोत्सव साजरा करण्यात येत आहे. यामुळं सारसचे संशोधकही येथे उपस्थिती लावत असून गोंदियातल्या पर्यटनालाही मोठी चालना मिळणार आहे. मात्र यामागचा मुख्य हेतू आहे तो 'निष्ठावान प्रेमी' सारसला जगवण्याचा...

– श्री. **विनय पराडकर**

## युद्धस्य कथा रम्याः कृष्ण- अर्जुन संवाद

कुरुक्षेत्रात युध्दभूमीवर जेव्हा कर्ण व अर्जुन समोरा-समोर आले तेव्हा, कर्णाने वासुकी नामक अस्त्र धनुष्याला लावून अर्जुनाच्या दिशेने सोडले.

प्रत्येकाला वाटले- आता हे अस्त्र अर्जुनाचा शेवट करणार... तितक्यात, श्रीकृष्णाने आपल्या पायाचा भार रथावर दिला. रथ थोडा खाली खचला व ते अस्त्र अर्जुनाच्या गळ्याचा वेध न घेता मुकुट उडवून गेले.

नंतर, सूर्य अस्ताला गेल्यानंतर जेव्हा, युध्दविराम होत असे, तेव्हा, पहिल्यांदा श्रीकृष्ण रथाच्या खाली उतरत असे व नंतर अर्जुनाला खाली उतरण्यास हात देत असे.

जेव्हा, पूर्ण युध्द संपले व पांडवांचा विजय झाला, तेव्हा, श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, आधी तू रथाच्या खाली उतर. त्यानुसार अर्जुन रथाच्या खाली उतरला. त्यानंतर श्रीकृष्णाने घोड्यांचे लगाम घोड्यांच्या अंगावर टाकले. घोडे बाजूला काढले व नंतरच स्वतः रथाच्या खाली उतरला. दोघेही थोडे पावले चालून गेली तोच, रथाने धड धड करत प्रचंड पेट घेतला. जमलेले सर्व जण आश्चर्याने ते दृश्य पाहत होते.

तेव्हा अर्जुन म्हणाला, आपण रथातून उतरल्या उतरल्या रथ आपोआप कसा काय पेटला? अरे श्रीकृष्णा हा काय प्रकार आहे?

तेव्हा भगवान श्रीकृष्ण म्हणाले की, युध्दात जितकी शस्त्रं-अस्त्रं तुझ्या दिशेने सोडण्यात आली होती, ती माझ्यामुळे तुला स्पर्शही करू शकली नाहीत. ती सर्व अस्त्रं अदृश्य रूपाने रथाच्याभवती फिरत राहिली व आता जेव्हा मी तुझ्या रथाची धुरा सोडून दिली.. तेव्हा, ह्या अस्त्रांचा परिणाम आता तू पाहत आहेस.

त्याचप्रमाणे मानवी देह आहे. जोपर्यन्त परमेश्वराने आपले जीवनरूपी लगाम पकडले आहेत तोपर्यंत आपल्या देहात प्राण, आनंद, सुख, ऐश्वर्य नांदत आहे. पण जेव्हा तो आपणास सोडतो.. तेव्हा आपलीही अवस्था त्या रथासारखीच होते.

**– श्री. अजित करकरे**

# संस्थावृत्त

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे

बुधवार, दिनांक १० ऑक्टोबर २०१८ रोजी ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या सर्व नवनिर्वाचित विश्वस्त व सदस्यांची मिटींग होऊन कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा केली गेली.

**विश्वस्त मंडळ :–**

१ ) श्री. रवींद्र प्रभुदेसाई, विश्वस्त, २ ) श्री. प्रकाश गुणे- विश्वस्त ३ ) श्री. अभय आठल्ये, विश्वस्त ४) श्री. संजय आंबर्डेकर- विश्वस्त ५) पदसिद्ध विश्वस्त- श्री. चंद्रशेखर पुरोहित

**अध्यक्ष :–** श्री. चंद्रशेखर पुरोहित

**उपाध्यक्ष १. :–** श्री. विनायक शेणोलीकर

**उपाध्यक्ष २. :–** डॉ. सौ. श्रुती बोरवणकर

**कार्यवाह :–** श्री. संदीप कळके

**सहकार्यवाह १ :–** श्री. सुजित मोघे

**सहकार्यवाह २ :–** सौ. स्वाती गुणे

**खजिनदार :–** श्री. विनोद नवरे

**सहखजिनदार :–** श्री. संजय मिराशी

**कार्यकारिणी सदस्य :–**

१) सौ. ऐश्वर्या देवस्थळी, २) सौ. वर्षा मुळ्ये, ३) श्री. महेंद्रकुमार माईणकर, ४) श्री. माधव ठाकूर देसाई ५) श्री. अजित सरवटे (स्वीकृत),

**सांस्कृतिक समिती :–**

१) श्री. उदय सप्रे, २) सौ. पल्लवी बोरवणकर, ३) सौ. प्राची प्रभुदेसाई, ४) श्री. माधव धामणकर

**युवा समिती :–**

१) श्री. सुजित मोघे २) श्री. सुयश तांबे, ३) कुमारी कीर्ती मणेरीकर, ४) सौ. सुहास नवरे

**वधु–वर मंडळ समिती :–**

१) सौ. ऐश्वर्या देवस्थळी २) श्रीमती माधवी कयाळ, ३) श्री. संदीप कळके

**इमारत निधी समिती :–**

१) श्री. सचिन ताटके, २) श्री. चंद्रशेखर पुरोहित, ३) श्री. विनायक शेणोलीकर, ४) श्री. कुमार माईणकर

मागील कार्यकारिणीत फक्त दोन महिला होत्या. आता नव्या कार्यकारिणीत ७ महिला सदस्या; आम्ही केलेल्या आवाहनाला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन आल्या. ठाणे संघाची जुनी कार्यकारिणी सदस्यसंख्या ही विश्वस्त व सदस्य मिळून १७ होती, ती वाढून नव्या सदस्यांच्या आगमनाने नवी कार्यकारिणी सदस्यसंख्या २६ झाली.

अजून साधारण अडीच वर्षांनी ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू होत आहे, त्यानिमित्ताने अनेक भरगच्च कार्यक्रम व कार्य करण्याचा मानस व्यक्त झाला.

**– संदीप कळके**

कार्यवाह, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे

## कऱ्हाडे ब्राह्मण सेवा संघ, डोंबिवली

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली दि. २०.०९.२०१८ रोजी संस्थेच्या नवीन मिनी सभागृहाचे संस्थेचे अध्यक्ष श्री.सुहास पंडित यांचे हस्ते गणपती पूजन करून उद्घाटन करण्यात आले. त्या प्रसंगी संस्थेचे संचालक मंडळातील तसेच व्यवस्थापक मंडळातील काही मंडळी उपस्थित होती.

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाचे स्वत:चे एक मोठे सभागृह, क्षमता साधारणपणे दोनशे व्यक्ती, एक कॉन्फरन्स हॉल क्षमता साधारणपणे पन्नास ते साठ व्यक्ती व आता नवीन मिनी सभागृह साधारणपणे साठ ते सत्तर व्यक्ती तसेच एक डायनिंग हॉल, अशी सुसज्ज व्यवस्था आहे.मोठा हॉल व कॉन्फरन्स हॉल वातानुकूलित आहेत. मिनी हॉल वातानुकूलित करण्याच्या विचाराधीन आहोत.

**– श्री. प्रदीप हळबे**

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली

*** दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा! ***

**श्री. संजय आंबर्डेकर, ठाणे**
मो. ९८२०४ १७९८१

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त

रविवार, दिनांक १९ ऑगस्ट २०१८ रोजी पुणे येथील रमारमण हॉल येथे महासंघाची दुसरी वार्षिक सर्व-साधारण सभा महासंघाने आयोजित केली होती. या सभेस विविध संघांचे एकूण ३५ प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वप्रथम मा. अध्यक्षांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारल्यानंतर ज्ञातीमधील ज्ञात-अज्ञात ज्या बांधवांचे दुःखद निधन झाले त्यांना आणि भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर उपस्थित सभासदांनी आपला परिचय करून दिल्यानंतर विषयसूचीनुसार चर्चा सुरू झाली. सर्व संघांना सर्वसाधारण सभेची सर्व कागदपत्रे पोस्टाने पाठवली असल्याने मागील सभेचे इतिवृत्त वाचावे किंवा नाही यावर चर्चा झाली आणि सर्व संघांनी ते वाचले असेलच, असे गृहीत धरून इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.

त्यानंतर वर्ष १७-१८ ची आर्थिक पत्रके सादर करून त्यावर चर्चा हा विषय होता. संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. संजय आंबर्डेकर ह्यांनी प्रकृती-अस्वास्थ्यामुळे उपस्थित राहता येत नसल्याने सदर आर्थिक पत्रके सचिव श्री. गणेश गुर्जर हे सादर करतील असा मेसेज दिला होता. त्यानुसार सचिव श्री. गणेश गुर्जर यांनी सभापटलावर आर्थिक पत्रके सादर केली आणि त्यावर चर्चा करण्यास अधिक माहिती हवी असल्यास विचारावी, असे सुचविले. येथे नमूद करताना आनंद वाटतो की, आपल्या संस्थेचे लेखापाल मा. श्री. प्रांजल जोशी यांनी सखोल माहिती दिली, त्यामुळे उपस्थित प्रतिनिधींचे समाधान झाले आणि सन २०१७-२०१८ च्या आर्थिक पत्रकांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. या सभेमध्ये अंतर्गत हिशोब तपासनीस समितीची नियुक्ती करण्यांत आली.

पुढील विषय हा संपर्कबाबत माहिती आणि चर्चा असा होता. यावर सखोल चर्चा झाली आणि मा. अध्यक्षांनी संपर्कसाठी एक संपादक मंडळ नियुक्त करण्याची सूचना केली. त्यानुसार संपादक मंडळ नियुक्त करण्यात आले आणि ऑक्टोबर १८ पासून हे मंडळ कार्य सुरू करेल.




त्यानंतर श्री. आनंद पराडकर, नागपूर यांनी घटना/नियमावलीमध्ये दुरुस्ती करण्याबाबत विषय मांडला आणि विश्वस्त मंडळाची संख्या वाढवावी, असे सुचविले. यावर सचिव श्री. गणेश गुर्जर यांनी, जर नियमावलीमध्ये काही बदल करायचे/सुचवायचे असतील तर एक उपसमिती नेमून बदल सुचवून ते विश्वस्त मंडळाकडे सादर करावेत आणि पुढील सर्वसाधारण सभेमध्ये त्यात मान्यता घेऊन धर्मादाय आयुक्तांकडे मंजुरीसाठी सादर करावे लागतात, अशी माहिती दिली. त्यानुसार या नियमावलीमध्ये जर आणखी काही बदल सुचवायचे असतील तर ते सुचवून त्यावर विचारविनिमय करण्यासाठी मा. अध्यक्ष यांनी एक उपसमिती नियुक्त करून त्यांच्या सभासदांची नावे जाहीर केली.

यानंतर सभेचे कामकाज संपन्न झाल्याचे आणि सर्व उपस्थितांनी सक्रिय सहभाग घेऊन सभा यशस्वी केल्याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले. तसेच मा.श्री. प्रांजल जोशी यांनी सभेस उपस्थित राहून सर्व शंकांचे योग्य प्रकारे निरसन केले, त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद दिले आणि श्री. वेलणकर यांनी या सभेसाठी हॉल व खानपान व्यवस्था उत्तम प्रकारे केल्याबद्दल धन्यवाद दिले.

यानंतर महासंघातर्फे काही कलाकार आणि कार्यकर्ते यांचा सत्कार करण्याची प्रथा पुढे ठेवताना मुंबईचा संघ हा प्रथम संघ असल्याने त्या संघातील ज्या कार्यकर्त्याने २५ वर्षे सेवा केली असे मा.श्री. अविनाश तांबे यांच्या कार्याचा गौरव मा. अध्यक्षांनी केला. सत्कार स्वीकारल्यानंतर त्यांनी मनोगत व्यक्त केले आणि महासंघाला रु. २५०१/- ची देणगी दिली. त्यानंतर कलाकार म्हणून सुप्रसिद्ध शहनाईवादक कै. बिस्मिलाखाँ यांचे पट्टशिष्य श्री. शैलेश भागवत ठाणे यांचाही सत्कार मा. अध्यक्षांनी केला. सत्कारास उत्तर देतांना 'अनेक सत्कार झाले, पण आपल्या ज्ञातिबांधवांकडून म्हणजेच आपल्या कुटुंबवत् असलेल्या कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने केलेला सत्कार अधिक भावला' असे सूचित केले. हा कार्यक्रम करतांना सूत्रसंचालक म्हणून श्री. अविनाश हळबे यांनी उत्तम प्रकारे

सूत्रसंचालन केले. त्यांच्या कार्याची माहिती देतांना सचिव श्री. गणेश गुर्जर यांनी त्यांच्या लेखनाचा, जी पुस्तके प्रकाशित झाली त्याचा आणि सामाजिक कार्याचा उल्लेख केला. अष्टविनायकाच्या सर्व देवस्थानांत त्यांनी प्रत्येकी १००१ वेळा अथर्वशीर्षाचे आवर्तन केल्याच्या विक्रमाची माहिती दिली.

या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित प्रतिनिधी, कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणेचे सभासद तसेच केबीबीएफ या व्यावसायिक कऱ्हाडे संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांना मा. सचिव यांनी धन्यवाद दिले आणि दोन्ही सत्कारमूर्तींनी त्यांचा गौरव करण्याची संधी दिली, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. चहापानानंतर हा हृद्य सोहळा संपन्न झाला.

**–सचिव श्री. गणेश गुर्जर**

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा संघ, डोंबिवली - वर्षासहलीचा अहवाल

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा संघ, डोंबिवली, जि. ठाणे या संस्थेच्या सभासदांची वर्षासहल दि. २९ जुलै २०१८, रविवार रोजी कल्याणजवळील भिसोळे गाव येथे उभारलेल्या 'N Joy Farm' येथे आयोजित करण्यात आली. या सहलीच्या नियोजनाची जबाबदारी संस्थेच्या डोंबिवली (प.) कार्यकारिणीतर्फे पार पाडण्यात आली. सहलीच्या नियोजनात प्रामुख्याने पश्चिम कार्यकारिणीच्या नगरप्रमुख श्रीमती पद्मजा पुरोहित, उपाध्यक्षा श्रीमती क्षमा धामणकर, सहकार्यवाह श्री. अनिरुद्ध शेंबेकर यांचा मोलाचा वाटा होता.

या सहलीत एकूण ४७ सदस्य सामील झाले. सकाळी ६.३० वा. डोंबिवली (प.) येथून सहल सुरू झाली. ८.३० वा. नियोजित स्थानी पोहोचल्यावर सर्वांची ओळख करून घेण्यात आली, तसेच सहलीला मिळालेल्या प्रतिसादाबाबत कार्यवाह श्री. ओंकार खेर यांनी सर्वांचे आभार मानले. त्यानंतर सर्वांनी नाश्त्याचा लाभ घेतला.

त्यानंतर विज्ञानाद्वारे केलेले मनोरंजनात्मक प्रयोग सर्वांनी पाहिले. त्यात Anti-Gravity, तरंगता साधू, पाताळाची खोली, गायब Mr. X, उडता आरसा, शक्तीचा खेळ, फिरता गणपती इत्यादी प्रयोग सर्वांनी पाहिले व अनुभवले. तसेच उपस्थितांनी Rain Dance व Swiming Pool मध्ये आनंद घेतला.

दुपारी १.०० वा. सर्वांनी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला. आयोजकांनी विश्रांतीसुद्धा न घेता व न घेऊ देता सर्वांना खेळ खेळण्यात सहभागी करून घेतले. त्यात बौद्धिक, शारीरिक, बैठे खेळ यांचा समावेश होता. त्यानंतर बक्षिसांचे वाटप संस्थेचे अध्यक्ष सुहास पंडित यांच्या हस्ते झाले.

संध्याकाळी ५.०० वा. चहापानानंतर परतीचा प्रवास सुरू झाला आणि गमती-जमतीमध्ये सहल संपन्न झाली.

सहलीच्या नियोजनात काही त्रुटी राहिल्यास त्याबाबत क्षमस्व आणि सहल यशस्वी केल्याबाबत सर्वांचे आभार...

पुढील वेळी अधिक चांगल्या प्रकारे आयोजन करण्याचे आमचे प्रयोजन राहील.

**- श्री. ओंकार खेर,**
कार्यवाह, डोंबिवली (प.)

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा संघ, डोंबिवली - कांदे नवमी

रविवार, दि. २२ जुलै २०१८ रोजी संध्याकाळी ५.०० वा. संस्थेच्या सभागृहात कांदेनवमीच्या निमित्ताने संस्थेच्या सभासदांचे स्नेह-संमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमात सभासदांच्या कुटुंबीयांसाठी विविध गुणदर्शन तसेच गमतीचे खेळ व प्रश्न-मंजूषा आयोजित करण्यात आली होती. सभासदांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी उत्साहाने विविध प्रकारचे कार्यक्रम (गाणी, अभंग, एकपात्री नाट्यछटा इ.) करून या कार्यक्रमाची रंगत वाढवली. सांस्कृतिक समितीचे कार्यवाह श्री. परशुराम काळेले यांनी विविध विषयांवरील प्रश्न विचारून उपस्थित प्रेक्षकांच्या ज्ञानात चांगली भर घातली व मनोरंजन पण चांगले झाले.

सरते शेवटी कांदा-बटाटा भजी, गरम मसाल्याची आमटी-भात, जिलेबी-मठ्ठ्याने तृप्त झालेले प्रेक्षक पुढच्या वर्षीच्या कार्यक्रमाची मागणी करून रात्री ९/९.३० ला आनंदाने निरोप घेते झाले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. माधुरी येल्लापूरकर, श्रीमती प्राची देवस्थळी व श्री. परशुराम काळेले यांनी अतिशय उत्कृष्टपणे केले.

कार्यक्रमाला १५० सभासद उपस्थित होते.

**- सौ. माधुरी श. येल्लापूरकर**
डोंबिवली पूर्व नगर कार्यकारिणी

## कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे

# बालक-पालक मेळावा २०१८

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळातर्फे शिक्षण समिती व डोंबिवली पश्चिम नगर कार्यकारिणी यांनी आयोजित केलेला बालक-पालक मेळावा दि. १५ जुलै २०१८ रोजी सायंकाळी ५.३० वा. संस्थेच्या समाजमंदिर सभागृहात संपन्न झाला.

या मंगलमय कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. या वेळी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. सुहास पंडित, सरकार्यवाह श्री. नितीन शेंबेकर, प्रमुख पाहुणे मा. श्री. श्रीराम पुरोहित, शिक्षण समितीप्रमुख सौ. मीनाक्षी काळेले व पश्चिम नगर कार्यकारिणी प्रमुख सौ. पद्मजा पु. पुरोहित मॅडम उपस्थित होत्या.

दीपप्रज्वलनानंतर सौ. विद्या देशमुख यांनी ईशस्तवन केल्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्रीमती प्राची देवस्थळी यांनी संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली.

नंतर सरकार्यवाह श्री. नितीन शेंबेकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा थोडक्यात घेत आगामी काळात होऊ घातलेल्या काही गोष्टींची उपस्थितांना माहिती दिली.

डोंबिवली पश्चिम नगर कार्यकारिणीचे कार्यवाह श्री. ओंकार खेर यांनी आपल्या ओघवत्या भाषेतून प्रमुख पाहुणे मा. श्री. श्रीराम पुरोहितसरांचा परिचय करून दिला आणि त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री. सुहास पंडित यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांना शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमानंतर शिक्षण समितीप्रमुख सौ. मीनाक्षी काळेले यांनी या बालक-पालक मेळाव्याची कल्पना व त्यामागील भूमिका उपस्थितांना थोडक्यात सादर केली.

यानंतरचा सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे संस्थेचे अध्यक्ष श्री. सुहास पंडित व सरकार्यवाह श्री. नितीन शेंबेकर यांच्या हस्ते शिक्षण दत्तक योजनेतील १ ली ते १० वी च्या लाभार्थी विद्यार्थी/विद्यार्थिनींना धनादेश व विद्यार्थ्यांना उपयोगी अशा वह्या व लेखनसामुग्री वाटप करण्याचा झाला.

या कार्यक्रमानंतर इ. १० वी व १२ वी मध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक व गुणगौरव करण्याचा कार्यक्रम प्रमुख पाहुणे मा. श्री. श्रीराम पुरोहित यांच्या हस्ते करण्यात आला. यंदाचे खास वैशिष्ट्य म्हणजे संस्थेच्या सभासदांपैकी श्री. प्रवीण करकरे यांची मुलगी कु. रिद्धी करकरे हिला १००% मार्क व श्री. सचिन ठाकूरदेसाई यांची मुलगी कु. स्वरांगी ठाकूरदेसाई हिला ९९.८०% मार्क मिळून डोंबिवली व अंबरनाथ येथे प्रथम येण्याचा मान त्यांनी मिळवला. त्याबद्दल त्यांना स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर १० वी-१२ वी परीक्षेत, पदवी व पदव्युत्तर परीक्षेत उत्तम मार्कांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करून गुणगौरव करण्यात आला.

या सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांना भावी जीवनात उपयोगी पडेल असे मोलाचे मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यांनी केले. खरे तर कार्यक्रम रंगत असतानाच वेळेच्या अभावी प्रमुख पाहुण्यांना मार्गदर्शन थोडक्यात पूर्ण करावे लागले, याची जाणीव उपस्थित सर्वांना झाली.

त्यानंतर याच कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना 'जीवनात हमखास यशस्वी कसे व्हावे' यावर डोंबिवलीतील खास मार्गदर्शक श्री. प्रसन्न हर्डीकर व श्री. अविनाश कुलकर्णी यांनी बोधपर मार्गदर्शन करून केवळ विद्यार्थीच नव्हे तर पालकांनाही जागृत केले.

मध्यंतरात सर्वांना 'माझा' पेय देण्यात आले. बालक-पालक मेळाव्यासाठी श्री. राहुल विभांडिक यांनी कोका-कोला कंपनीकडून 'माझा' पेय उपलब्ध करून दिले आणि श्री. अनिल राव, मार्केटिंग मॅनेजर, डाबर इं. यांच्याकडून फ्रूट ज्यूस दिले. श्री. शैलेश रमेशचंद्र धात्रक (नगरसेवक) व सौ. मनीषा शैलेश धात्रक (नगरसेविका) यांनी मुलांना वाटपासाठी वह्या दिल्या.

या सर्व नेत्रदीपक अशा कार्यक्रमाची सांगता सौ. वर्षा प्रभुदेसाई यांच्या आभार प्रदर्शनाने झाली, त्यानंतर सौ. माधुरी येल्लापूरकर यांच्या भावपूर्ण आवाजातील पसायदानाने झाली. उपस्थित असलेल्या सर्वांनी अल्पोपाहार व चहा-कॉफीचा आस्वाद घेतला व नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**सौ. मीनाक्षी काळेले**
(शिक्षण समितीप्रमुख)
क. ब्रा. सेवा मंडळ, डोंबिवली (प.)

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई - सहल

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईतर्फे दर वर्षी प्रमाणे या वर्षीही वर्षा सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सहल दि. ५ ऑगस्ट २०१८ रोजी पॅराडाईज फनलँड, जुईपाडा, पडघा-भिवंडी येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण १६२ सदस्य/कुटुंबीय सहभागी झाले होते.

आबाल-वृद्धांनी सहलीचा आनंद मनमुराद लुटला. दुपारी भोजनोत्तर करमणुकीचा व जादूच्या प्रयोगांचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. जादूगार श्री. अभिजीत यांनी सर्व सभासदांसाठी खेळ खेळवून घेतले व नंतर जादूचे प्रयोग सादर केले. अशा प्रकारे सहल यशस्वी झाली व सर्व जण रात्री आपापल्या घरी सुखरूप पोहोचले.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईने केलेल्या आवाहनाला, सहलीच्या आयोजनाला नेहमीप्रमाणे उदंड प्रतिसाद लाभला आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले. ह्याबद्दल क. ब्रा. संघ, मुंबई कार्यकारिणी तर्फे सर्व सदस्यांचे अभिनंदन. दरवर्षी असाच प्रतिसाद सभासदांकडून अपेक्षित आहे.

**श्री. प्रसाद पंडित**
कार्यकारिणी सदस्य,
क. ब्रा. संघ, मुंबई

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा- वर्धापनदिन

कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा वर्धापनदिन सोहळा बुधवार, दिनांक : २२ ऑगस्ट २०१८ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. यशवंत पाटणे तसेच कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे सचिव गणेश गुर्जर यांची प्रमुख उपस्थिती होती.



गणेश वंदना व दीप-प्रज्वलनाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली. संघाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भाटे यांनी प्रास्ताविकात प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, तसेच संघाच्या कार्याचा आढावा घेतला. सातारा कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष अनिलराव काटदरे यांनी प्रमुख अतिथींचा सत्कार केला. गणेश गुर्जर यांनी मनोगत व्यक्त करताना महासंघाच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिति सभासदांना करून दिली.

पाटणेसरांनी 'सुंदर जगण्यासाठी' या विषयावर विचार व्यक्त करताना सांगितले की शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक सुस्थिती म्हणजे उत्तम आरोग्य; तसेच हेल्थ या शब्दाचा भावार्थ सांगितला. ते म्हणाले, प्रेम हे आपल्या संस्कृतीचे पवित्र मूल्य आहे. संवादातील शब्दांना प्रेमाचा ओलावा लागला की, जीवनालाच एक सुरेल सूर प्राप्त होतो. या वेळी त्यांनी सप्तसुरांचा सुंदर अर्थ विशद केला.

कार्यक्रमात इयत्ता १०वी, १२वीच्या परीक्षेत उत्तम गुण संपादन केलेल्या कुटुंबातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब भाटे यांनी केले. सुधीर करंबेळकर यांनी आभार मानले. शेंबेकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन केले. सौ. पराडकर यांनी पसायदान गायले. चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास कऱ्हाडे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**श्री. भालचंद्र करंबेळकर**
-क.ब्रा. संघ, सातारा

*** दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा! ***
**श्री. प्रसाद प्रभाकर पंडित, मुंबई**
मो. ९२२३४ ५०९००

# खजूर

खजूर हे पूर्ण अन्न आहे. उष्ण हवामानात व प्रदेशात खजूर तयार होतो. तो पोटात गेल्याबरोबर पचायला सुलभ अशा गुणांचाच असतो. खजूर जसाचा तसा पूर्णपणे आतड्यांनी ग्रहण केला जातो. पचायला बिलकुल जड नाही. खजूर उष्ण आहे, अशी समजूत आहे. खजूर वात व पित्तशामक कार्य करतो. वजन वाढवतो. शरीराला तृप्ती आणतो. म्हातारपणा दूर ठेवतो. ज्यांना शंभर वर्षे जगण्याची इच्छा आहे, त्यांनी खजूर नियमितपणे खावा. खजूर तुपाबरोबर घेतल्यास त्याचे गुण वाढतात. खजुरात ए, बी, सी व्हिटॅमिन व भरपूर साखर तसेच लोह आहे.

वाढलेल्या पांथरीवर खजूर उपयोगी पडतो. खजुराच्या चार बियांचा गर कुस्करून पाण्याबरोबर नियमितपणे महिनाभर खावा. पांथरी कमी होते. खजूर सारक आहे. त्यामुळे पोट साफ होते. त्वचेच्या सुरकुत्या दूर होतात. कांती सुधारते, रक्त वाढते. खजूर खाण्याअगोदर त्याचा दर्जा बघावा. खजूर अत्यंत अस्वच्छपणे आयात होतो. त्याचा वापर करणारे गलिच्छपणे त्याचा व्यवहार करतात. त्याकरिता खजूर गरम पाण्याने स्वच्छ धुऊन मगच खावा.

तृषार्त किंवा खूप शोष पडणाऱ्यांनी खजुराच्या दोन-चार बियांचा मगज थोडा वेळ पाण्यात भिजत ठेवून ते पेय घ्यावे. वृद्ध व लहान कृश बालकांकरिता दोन खजूर, चिमूटभर जिरे व चवीला गूळ किंवा साखर अशा मिश्रणाचे सरबत मिक्सरमध्ये करावे. चहा, कॉफी किंवा खूप जाहिरातींच्या टॉनिकपेक्षा उत्तम पेय म्हणून काम देते.

खजुराचा विशेष फायदा मेंदू, हृदय, कंबर, वृक्क या अवयवांना बल देण्यात होतो. तापातून उठलेल्यांकरिता खर्जूरमंथ किंवा रवीने घुसळून तयार केलेले खजुराचे सरबत फार चांगले गुण देते. अतिकृश बालकांना वजन वाढवायला खजुराचा उपयोग होतो. दातांचे आरोग्य मात्र खजूर खाताना सांभाळावे लागते. काळा किंवा लालबुंद खजूरच खावा.

निवडुंगाच्या बोंडांपासून 'नवजीवन' नावाचे एक अफलातून औषध लहान बालकांच्या दुर्धर खोकला विकाराकरिता वापरले जाते. त्याच्या औषधी निर्माण प्रक्रियेत आसुत क्रियेकरिता- फर्मेंटेड प्रोसेसकरिता खजुराच्या सत्त्वांशाचा वापर केला जातो. कोरड्या खोकल्याकरिता वापरल्या जाणाऱ्या एलादी वटीत तसेच खर्जुरासवात खजुराचा मोठा सहभाग आहे. अशा या खजूर आणि खारकेचा उपयोग आपल्या आहारात जरूर करावा.

**– श्री. मनोज पंडीत.**

# डिंकाचे लाडू

**बहुगुणी डिंक**: डिंक हा पदार्थ सर्वांच्या परिचयाचा आहे. संस्कृतमध्ये याला क्षीरिवृक्ष असे म्हणतात. कारण झाडाच्या आतील चीक बाहेर वाहतो व वाळून झाडाला चिकटून राहतो. त्यालाच आपण डिंक म्हणतो. बाभूळ, वड, पिंपळ, खैर, उंबर या झाडांतून डिंक फार निघतो. पण आपल्याकडे बाभुळीचा डिंक म्हणून बाजारात मिळतो तोच आपण वापरात आणतो. खरे तर बाभुळीचा डिंक सर्वात उत्तम. पण बाजारात मिळणारा डिंक अस्सल असेलच असे नाही कारण सर्वच डिंकांचा रंग पिवळा, तांबूस असतो. डिंक अनेक प्रकारे औषधी आहे. खडे तोंडात ठेवल्यास कफ विरघळतो. तोंड आल्यास डिंकाच्या पाण्याच्या गुळण्या करतात. सर्वांत शक्तिवर्धक म्हणून याचा वापर होतो. सांधे, कंबर दुखीवर रामबाण उपाय असे मानतात.

**साहित्य** : पाव किलो डिंक, अर्धा किलो सुके खोबरे, ५० ग्रॅम खसखस, काजू, बदाम, खिसमिस प्रत्येकी ५० ग्रॅम, एक किलो गूळ अगर साखर, एक जायफळ व तूप.

**कृती** : प्रथम खोबरे किसून खमंग भाजून घ्यावे. काजू, बदामचे तुकडे करावेत. खसखस पण भाजून घ्यावी. नंतर डिंक तळून त्याच्या लाह्या करून सर्व वस्तू खसखस सोडून बारीक कुटून अगर मिक्सरमध्ये बारीक करून घ्याव्यात. पाव किलो खारकेची पूड तुपावर थोडी भाजून घ्यावी. ती सर्व वस्तूत मिक्स करावी. नंतर गुळाचा किंवा साखरेचा पक्का पाक करून त्यात सर्व वस्तू घालून मिक्स कराव्यात. एक वाटी तूप नुसतेच ओतावे व खिसमिस, खसखस, जायफळ पूड शेवटी घालून सर्व चांगले चुरून लाडू वळावेत. हे लाडू शक्तिवर्धक आहेत म्हणून बाळंतिणींना व सर्वांनाच उपयुक्त असतात. हिवाळा व पावसाळा या ऋतूत हे लाडू खाणे योग्य असते.

**– कमला कळके**



# The Karhaadaa Braahman!

Moving majestically through, for the last two years on this day!

"The Karhaadaa Braahmana!" I do not remember, the occasion, purpose etc of the cause in posting this beautiful delineation of the characteristics of the Karhaadaa Braahman community as such, on this day last year ! Howsoever, any good thing, even if given repeatedly, it is, no doubt, beneficial to all ! So .......

The karhaadaa Braahmana community is a known community as such, from the third century AD. The only documented community, has produced a number of eminent sons and daughters from historical period !

Anthropologically distinguished community adorned its distinguished position in number of fields of human activity, running over ninety, wherein the Karhaadaas have a superb contribution !

So continuous and brighter is the contribution, that the competitors started neglecting their mentions in number of compelling places and occasions that resulted in a trend , as it were , in public life !

Let us all be aware of our contribution to public life, wherever we are, and be vigorously contributing our selfless, cleanest, unselfish and proven reliable assistance and help, to the humanity spread on larger horizon of the world, that is full of disturbance, callous,hatred, enimical, vicious and promoting inhuman properties ! Wish all Karhaadaa community people, a still brighter future and further contentment in their respective positions and still most valuable their dearer lives !!

**- Shri. Avdhoot Hardikar,**
Pune


।। श्री आर्यादुर्गा प्रसन्न ।।

गणेश गुर्जर परिवारातर्फे कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास

**हार्दिक शुभेच्छा!**



व्यावसायिक प्रतिष्ठान

**SDS ENTERPRISES**

'Sarthak', 4/5/5 A, Erandwane, Patwardhan Sahakari
Grih Rachana Sanstha Mydt, Pune 411 004.

**Solution for all Computer Needs**

Shri Ganesh Gurjar
Mo. 98909 90113


Shri Shantanu Gurjar
Mo. 98909 90112

*** दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा! ***

श्री. विजय आंबर्डेकर, मुंबई
मो. ९८१९८ ८५६६५

व्यक्तिविशेष / परिचय

# मंदार मनोहर तांबे



कैलासवासी श्री. मनोहर तांबे आणि गं. भा. मंगला तांबे ह्यांचे चिरंजीव मंदार तांबे हे जरी जगभर फिरले असले, तरीही आपली नाळ ठाकूरद्वारमध्ये जोडली आहे ह्याची त्यांना जाणीवही आहे आणि अभिमानही!!

सिडनहॅम महाविद्यालयातून वाणिज्य शाखेतून उत्कृष्ट मार्कांनी उत्तीर्ण झाल्यावर श्री. तांबे ह्यांनी सुरुवातीला स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये नोकरी केली. बँकेत नोकरी करत असतानाच त्यांनी १९८३ मध्ये एकाच वेळी कायद्याचा व कंपनी सचिवाचा व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केला आणि व्यावसायिक आयुष्याला सुरुवात केली.

श्री. तांबे यांनी काही काळ प्रसिद्ध कंपन्यांमध्ये कंपनी सचिव/ कायदेप्रमुख अशा नोकऱ्या केल्या आणि नंतर ते १९९० चया सुमारास टाटा उद्योगसमूहाशी निगडित झाले. तिथेही टाटा इंटरनॅशनल, टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स वगैरे अग्रगण्य टाटा कंपन्यांत कंपनी सचिव/ कायदेप्रमुख म्हणून काम केल्यावर त्यांना वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून बढती दिली गेली आणि ते टाटा इंटरनॅशनलचे आंतरराष्ट्रीय कायदे कज्जे व लवाद तसेच व्यापारविषयक कामकाज पाहू लागले. त्या निमित्ताने त्यांना जगातील अनेक देशांत जाण्याची संधी मिळाली. अनेक आंतरराष्ट्रीय लवादांत त्यांनी टाटा कंपन्यांतर्फे सिंगापूर, लंडन, न्यूयॉर्क, हाँगकाँग, व्हिएन्ना, झुरिच, दुबई, तेहरान वगैरे ठिकाणी टाटांची बाजू यशस्वीपणे मांडून योग्य प्रतिनिधित्व केले. काही कंपन्यांचे ते निर्देशकही होते व आहेत.

१९९८ मध्ये फुलब्राईट फाउंडेशन ह्या जगप्रसिद्ध अमेरिकन संस्थेने अखिल भारतीय स्तरावर वय वर्षे ४० हून कमी पण वरिष्ठ स्तरावरील कामकाजाचा अनुभव १० वर्षांपेक्षा अधिक असलेल्या ३ जणांना फुलब्राईट मानद पुरस्कारासाठी निवडले आणि त्यांना अमेरिकेत जगातील पहिल्या ५ विश्वविद्यालयांपैकी एक अशा कार्नेगी मेलॉन (पिटसबर्ग) विश्वविद्यालयात उच्च व्यवस्थापनाचे शिक्षण घेण्यासाठी पुरस्कृत केले. त्यादरम्यान अमेरिकेतील अग्रगण्य अशा अनेक कंपन्यांशी आणि त्यांच्या व्यवस्थापकांशी तांबे ह्यांचे संपर्क झाले, संबंधही प्रस्थापित झाले.

त्यांनी २०१० मध्ये स्वतःच्या सुमंत्रा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस व एम अँड एम कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अशा दोन कंपन्या सुरू केल्या असून ते जगातील विविध स्तरांतील देशी- विदेशी कंपन्यांना भारतात व परदेशात आंतरराष्ट्रीय उद्योग कसे उभारावेत, त्याचे व्यवस्थापन कसे करावे ह्याविषयी मार्गदर्शन करत आहेत.

श्री. तांबे व त्यांची सुविद्य पत्नी मैत्रेयी दोघांनाही पर्वतारोहण व निसर्गभ्रमणाची आवड असून त्यांनी सह्याद्री व हिमालयात खूप भ्रमंती केली आहे. श्री. तांबे ह्यांना कामाच्या निमित्ताने फिरताना युरोपमध्ये आल्प्स, आफ्रिकेत मसाई माराच्या जंगलात, दक्षिण अमेरिकेत ॲमेझॉनच्या जंगलात, अमेरिकेत ग्रँड कॅननमध्ये जंगल आणि दुर्गभ्रमंती करण्याचा योग आला.

सामाजिक बांधिलकीच्या नात्याने ते अनेक अंध शाळा, दूरदूरच्या गावातल्या शाळा व तेथील गरीब विद्यार्थ्यांना ते मदत करत असतात. अनेक संस्थांमध्ये त्यांनी वाचन व नव्या व्यवसायासाठी शिष्यवृत्या व पारितोषिके ठेवली आहेत. त्यानिमित्ताने समाजाचे ऋण अल्प प्रमाणात का होईना फेडण्याचे प्रामाणिक प्रयत्न ते करत असतात.

– श्री. प्रसाद पंडित

(क. ब्र. संघ, मुंबई)

* दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा! *

श्री. गणेश गुर्जर, पुणे
मो. ९८९०९ ९०११३

# डॉ. श्रीकृष्ण जोशी - अल्प परिचय

शैक्षणिक-एम.ए.बी.एड्., पीएच.डी. मराठीचे अध्यापन, 'प्रभाकर पाध्ये यांच्या ललित साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएचडी. वास्तव्य- रत्नागिरी प्रकाशित साहित्य- कादंबरी- शेंबी, घसरण, महाराज, घर दोघांचे, अगतिक, नंतर, शल्य, शापित, तुझ्याशिवाय, काटशह, कातळ, अथांग, मार्शिलँड, समांतर, वादळवेणा, भोवरा, ब्रेकींग न्यूज. दीर्घ कथासंग्रह- रानोमाळ, रानवा. सगीत नाटक- सं. शांतिब्रह्म, सं घन अमृताचा. सं. राधामानस, सं. ऐश्वर्यवती, सं. ऋणानुबंध, सं. स्वरयात्री. नाटक- चिन्नुच घर, स्वप्नपक्षी अरे चल चल. काव्य संग्रह - खडुचे अभंग, कथासंग्रह- ड्रॉवर, ललितलेख, रौद्रलेणी, पडघम बालवाङ्मय- अपूर्वा, गोष्टीरुप चाणक्य, सरदार वल्लभभाई पटेल

वरील साहित्यामधील खडुचे अभंग हा काव्यसंग्रह असून त्यामध्ये १०१ अभंग आहेत ते क्रमशः प्रसिद्ध करू. पहिले काही अभंग खालीलप्रमाणे आहेत.

**एक**

वेडे वाकुडाले। लिहितो कशाला।
बिचाऱ्या खडूला। पुसे कोणी।।
काया झिजविणे। तुझा नेम धर्म।
इतुकेच कर्म। भाळी तुझ्या।।
हव्या कशाला त्या। नसत्या उचापती।
करावी बां वांती। एकदाची।।
एवढासा तुझा। जीव नाजुकसा।
पडेल का ठसा। जगावरी।।
ठावकी मजला। आहे मी खेळणे।
देह समर्पिणे। खडू म्हणे।।

- खडूचे जगणे आणि शिक्षकाचे जगणे यांत साम्य आहेच. दोन्ही संपल्यावर अस्तित्वच रहात नाही.

**दोन**

आवड निवड। बया जन्मा आल्या।
जन्मताच मेल्या। आई संगे।।
सुखाची शिदोरी। हवी होती बापा।
भलत्याच तापा। गुंतियेला।।
शुभ्र वाटेवरी। कापसाची गादी।
भलतीचे मादी। हक्क सांगे।।
तिचिया शब्दाला। जगी होते मोल।
परि जाय फोल। बाप यत्न।।
सांगावी कुणाला। बापाची कहाणी।
डोळा नुसते पाणी। खडू म्हणे-

- त्यागातून उभ्या राहिलेल्या शिक्षण संस्थांना संस्थानाचे रुप केंव्हा येते आणि भोगासाठी त्याचा वापर केंव्हा सुरू होतो हे अनेकांना कळत नाही. ज्यांना कळते तेंव्हा त्यांच्या फक्त आधाराला डोळ्यातले पाणी उरते, जे केवळ वाहून जाते. तहान भागवण्यासाठी त्याचा उपयोग कधीच होत नाही.

**।। तीन।।**

सुरवंटी जग। पानोपानी हाले।
मनामध्ये झुले। रोमांचाचे।।
हले झुले फांदी। भूक जागी झाली
पान झाले जाळी। अगतीक।।
सुरवंटी भूक। भलती खादाड।
झाडाचे ही खोड। प्रिय तिला।।
हादरे उभ्याने। शेजारचे झाड।
सुरवंटी धाड। पाहोनिया।।
ऐसा महिमा। वर्तमानी घडे।
सर्वांनाच धडे। खडू म्हणे।।

- एखाद्या घटकाला किती जणांनी शोषून घ्यावे याला मर्यादा असतात. पण शिक्षण घटकाला शोषणारे अमर्याद असतात. परिणामी बलात्कारितेच्या वाट्याला येणारे भोग शिक्षणक्षेत्राच्या वाट्याला येतात.

**।। चार।।**

अगा पांडुरंगा। कोठे बैसलासी।
मुमुक्ष दारासी। तिष्ठियेला।।
कुलुपाचे भान। दाराला नसावे।
कैसे हे सांगावे। बिचाऱ्याला।।
ओंजळ उघडी। पाण्याची तहान।
भांडे ही लहान। आर्ताळले।।
अगा पांडुरंगा। उघडी का दार।
मुमुक्षुची हार। उरलेली।।
फळा भिंतीवरी। पुस्तक बाजारी।
रीत नाही बरी। खडू म्हणे।।

- ज्ञानोत्सुकांनी आता केवळ तहानलेलं रहाव. आताशा पाणपोयातून पाणी मिळत नाही किंवा जे मिळत त्यालाच पाणी म्हणाव...समाधान करून घ्याव.

**।। पाच।।**

म्हणाले अतिथी। इथे स्कूल बांधा।
तिथे मूळ 'बांधा'। हर्षभरे।।
असा रंग लावा। उजेडासमान।
शोभेची कमान। हवीच ती।।
हवी एक पाटी। भली थोरली ती।
जनलोक येती। पहाण्या।।
जाणारे येणारे। कौतुक पाहती।
म्हणे थोर किती। दानशूर।।
आरंभी वंदावे। अशा दातृत्वाला।
वाव कर्तृत्वाला (!) खडू म्हणे।।

- शाळा म्हणजे- एक प्रदर्शनीय वस्तू- असलेल्या नसलेल्या मोठेपणाची साक्ष. - पापक्षालनार्थ बाधलेला घाट - आणि टाळ्या वाजवण्यासाठी मुलांचा गोठा.

# मनुष्यस्वभावाचे काही नमुने

एकदा मी बसमधून जात असताना बाजूला बसलेल्या बायकांत संवाद चालू होता. नणंद आपल्या वहिनीला म्हणाली की, मी आज तुझ्याकडे, वडिलांना मदत करायला आले आहे. तू खुशाल कोठेही जा. घरची काळजी करू नकोस. कारण तिचे वडील आजारी होते, असे संभाषणातून कळले. मला आनंद झाला.

बसच्या रांगेत उभी होते. एक म्हातारे गृहस्थ बाजूने जाणाऱ्या माणसाला 'मी तुला ओळखतो. तू माझ्याच कंपनीत नोकरीला होतास', असे कळवळून सांगत होते; पण तो माणूस अगदी निर्विकार चेहऱ्याने बघत होता व जरासुद्धा बोलत नव्हता. तेव्हा मला वाटले– समजा, तो जरी त्याच्या ऑफिसमध्ये कामाला नसला तरी केवळ त्याच्या समाधानासाठी 'हो' म्हणायला काही हरकत नव्हती. पण काही माणसे एवढी क्षुल्लक गोष्ट करायला तयार नसतात, त्याचे आश्चर्य वाटले.

मी पुष्कळ वेळा बँकेत कामासाठी जाते. जाताना दरवाजा उघडते, पण मला आंत जायला मिळत नाही, एकामागून एक माणसे येतात व जातात. मी मात्र द्वारपालासारखी उभी!

पत्ता विचारला तर काही बरोबर सांगतात, तर काही उगीच 'इकडे वळा, तिकडे वळा' म्हणून दिशाभूल करतात. आपल्याला माहीत नसला तर 'मला माहीत नाही' असे सांगायला काही हरकत नाही.

एकदा मला बॉलपेनसाठी रिफिल घ्यावयाची होती. नंतर विसरायला होईल म्हणून घरातून बाहेर पडल्यावर लगेच दुकानात दोन रुपयांची रिफील मागितली. दुकानदाराजवळ सुटे पैसे नव्हते. मी सांगितले, बाजारातून येताना पैसे देईन, पण त्याने रिफील दिली नाही. बाजारात भाजी घेतली व सुटे पैसे नसले तर भाजीवाल्या बायका म्हणतात, 'बाई, उद्या पैसे द्या' पण मी तसे करत नाही, कारण चुकून आपण विसरलो, तर त्यांचे नुकसान होता कामा नये.

खालील गोष्टी आठवणीने कराव्यात.

१) कॅलेंडरचा महिना बदला.

२) सणावाराला दारावर लावलेली तोरणे, फुलांची माळ सणवार झाल्यावर दुसऱ्या दिवशी आठवणीने काढा.

३) हळद-कुंकू लावताना बोटावर थोडे घेऊन नीट लावा. पिंजर, हळद खाली पडून डोळ्यांत जाणार नाही याची काळजी घ्या. हळद-कुंकू असले म्हणजे बऱ्याच ठिकाणची आमंत्रणे येतात. तेव्हा परत येताना कपाळावर नुसता मळवट झालेला असतो, म्हणून काळजी घ्या.

**– सविता मधुकर फणसळकर**

डोंबिवली, मो. ९८१९२ ८२८७३

## मेरी झाँशी नही दुँगी

'मेरी झाँशी नही दुँगी', राणीचे तेजस्वी उद्‌गार
अजूनही घुमतात या देशात, उसळतो स्वातंत्र्याचा एल्गार!
नेवाळकरांची ती कीर्ती, दुमदुमते दहा दिशात
झाशीचे अढळ स्थान, आमच्या मनामनात!
पुत्राला बांधून पाठी, घोड्यावर झाली स्वार
रणरागिणी झाली सिद्ध, हाती धारदार तलवार!
नारींची सारी सेना, पण मर्दानी आवेश
पाहून तयांचे तेज, थरथरला अवघा देश!
रणचंडिकाच त्या दुर्गा, प्रखर राष्ट्रभक्तीच्या ज्योती
ती मर्दानी झाशीवाली, त्यांची तेजस्वी सेनापती!
परक्यांची जुलुमी सत्ता, उलथून टाकण्या सज्ज
शिर तळहाती घेऊन, लढण्यास निघाल्या मत्त।
निर्भयाच झाल्या होत्या, स्वाभिमान भरून रक्तात
तळपल्या युद्धभूमीत– न्हाऊन देशप्रेमात!
अग्रणी तयांची राणी, पेटून शत्रुद्वेषाने
पडली तुटून त्यांच्यावरती, लखलखत्या वीरश्रीने!
परी घात शेवटी झाला, हात मृत्युचाच तो पडला
त्या धगधगत्या ज्वालेने, इतिहास अपूर्वच घडला!
ते वीरमरण (त्या) राणीचे, देवो स्फुरण आम्हाला नित्य
देशास्तव जगू या आता, देशहितास्तव लागो चित्त!
आज करू या तिचे स्मरण, करू तिचाच जयजयकार
प्रेरणा तिचीच घेऊन– देऊ(या) देशभविष्याला आकार!

**– सौ. वैशाली हळबे,** रत्नागिरी

# क्षण-जगलेले.....!!!

रंगभूमी वा रणभूमी ही नकोच जीवनाची
जन्म-मृत्यूच्या मधील असावी झुळूक पवनाची
जन्म-मृत्यूच्या दरम्यान असतो सुखदुःखाचा सागर
फुलवण्या सुखाचा अंकुर, घालावी दुःखाला फुंकर
जन्म-मृत्यूच्या मधील स्वप्नवत् जग प्रत्यक्षात अवतरावं
जगणेही तसचं आनंदी अन् प्रसन्न असावं
जगलेल्या क्षणांचं भांडवल करता येत नसतं
भूतकाळाने कितीही पिडले तरी मरता येत नसतं
जन्म कितीदा घेतले तरी क्षण गेलेले परत येणार नाही
मोह मायेच्या जत्रेमध्ये आपण हरवणार नाही
कारण जगायला मिळालेले क्षण गमवायचे नाही
प्रत्येक श्वासाबरोबर आहे एकच आस
दिसायला हवी प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सुख-समाधानाची रास
सुखद झुळूक ती पवनाची क्षणिकच असते
जास्तीत जास्त काळ यातना आणि वेदनांच्या आड दडून असते
पण तेव्हाच झुळूक पवनाची आपल्याला सुखावत असते!

**- श्रीपाद टेंबे, पुणे** (मो. ९१५८० ८८०४२)

---

# आषाढ मासी

जाते फुलूनी - नगरी पंढरी
दिंड्या पताकांनी - आषाढ मासी
संताची पंढरी - करीते साजरी
दीपावली खरी - आषाढ मासी
घालविती शीण - सारे वारकरी
करूनी वारी - आषाढ मासी
अभंग गाऊनी - कीर्तन ऐकूनी
होती समाधानी - आषाढ मासी
मिळवती स्फूर्ती - पाहूनी मूर्ती
विठू माऊलीची - आषाढ मासी
निरोप घेती - विठुरायाचा
घेऊन दर्शन - आषाढ मासी
मागणे एकची - पुन्हा दर्शनाची
पुढल्या वर्षी - आषाढ मासी

**- श्रीहरी गुणे**
फोन ०२०-२४५३८३५३

# 'नरो वा कुञ्जरो वा'

'नरो वा कुञ्जरो वा' किंवा 'अश्वत्थामा हतो नरो वा कुञ्जरो वा'

याचा मूळ उगम पुढीलप्रमाणे :- या वचनामागची गोष्ट द्रोणपर्वामध्ये ७-८ श्लोकांमध्ये दिली आहे ती अशी- द्रोणाचार्यांचा वध करण्यासाठी कृष्ण असे सुचवितो की, त्यांना निःशस्त्र केल्याशिवाय ते होणे अशक्य आहे. म्हणून अश्वत्थामा नावाचा एक हत्ती मारावा आणि द्रोणाचार्यांपर्यंत ही वार्ता पोहोचवावी. तदनुसार भीमाने हत्ती मारून तसे द्रोणाचार्यांना कळविले. तो आपला पुत्र अश्वत्थामा किंवा कसे ह्याची निश्चिती करण्यासाठी द्रोणाचार्यांनी सत्यवचनी युधिष्ठिराला ते विचारले. त्या वेळी त्याने अश्वत्थामा मारला गेला असे उच्च आवाजात सांगून 'हत्ती किंवा मनुष्य' हे शब्द आपल्याशीच उच्चारले. आपला पुत्र मारला गेला असे वाटून द्रोणाचार्यांनी शस्त्र खाली टाकले आणि हे पाहून धृष्टद्युम्नाने रथावर चढून त्यांचा वध केला.

महाभारतातील ह्याविषयीचा श्लोक असा आहे :

**तमतथ्यभये मग्नो जये सक्तो युधिष्ठिरः।**
**अव्यक्तमब्रवीद्राजन् हतः कुञ्जर इत्युत।।**

वेणीसंहार नाटकामध्ये ह्याच प्रसंगाचे वर्णन असे आहे-

**अश्वत्थामा हत इति पृथासूनुना स्पष्टमुक्त्वा**
**स्वैरं शेषे गज इति किल व्याहृतं सत्यवाचा।**
**तच्छ्रुत्वासौ दयिततनयः प्रत्ययात्तस्य राज्ञः**
**शस्त्राण्याजौ नयनसलिलं चापि तुल्यं मुमोच।।**

'नरो वा कुञ्जरो वा' किंवा 'अश्वत्थामा हतो नरो वा कुञ्जरो वा' हे शब्द महाभारतात वा अन्य कोठल्याच प्रसिद्ध रचनेत सापडत नाहीत आणि तरीही सर्व भारतीय भाषांमध्ये हे वचन सरावाचे आहे. मग ते आले कोठून? पुन्हा ते गद्यात आहे, कोठल्याच वृत्तात बसत नाही. सर्व संस्कृत रचना जवळजवळ ९९% काव्यबद्ध असतात, हेही गूढ आहेच.

ते वृत्तात बसविण्याचा एक प्रयत्न मला सापडला. **'अश्वत्थामा हतो ब्रह्मन् नरो वा कुञ्जरोऽथवा'** असा तो प्रयत्न आहे; पण ही कोणाची तरी नंतरची रचना दिसते कारण सर्वप्रसिद्ध वाक्य 'नरो वा कुञ्जरो वा' किंवा 'अश्वत्थामा हतो नरो वा कुञ्जरो वा' असेच आहे.

**- अनुराधा फणसळकर**

# गोत्र म्हणजे काय?

धार्मिक विधी करताना बऱ्याच वेळा 'आपले गोत्र काय?' असा प्रश्न गुरुजी विचारतात तेव्हा गोत्र म्हणजे काय? असा प्रतिप्रश्न करणारेदेखिल असतात. अशा वेळेला 'पूर्वजांपैकी कोणी एक पुरुष' असे उत्तर देऊन वेळ मारून नेणारे काही जण असतात. पण तसे नसून गोत्र ही वैदिक धर्माने दिलेली देणगी आहे. जन्मवंश शास्त्रदृष्ट्या अत्यंत सूक्ष्मस्तरीय एक मानवशाखा आहे.

'धर्मसिंधु' ग्रंथामध्ये गोत्राचे लक्षण पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

'तत्र गोत्र लक्षणम्- विश्वामित्रो जमदग्निर्भरद्वाजोऽथ गौतमः। अत्रिर्वसिष्ठः कश्यप इत्येते सप्तऋष्यः ।।'

विश्वामित्र, जमदग्नी, भरद्वाज, गौतम, अत्री, वसिष्ठ व कश्यप हे सात ऋषी आहेत आणि आठवे ऋषी अगस्त्य हे होत. यापैकी प्रत्येक ऋषीचे अपत्य म्हणजे गोत्र होय.

गोत्रांची संख्या अगणित असली तरी धर्माने त्यांची व्यवस्था सुलभ व्हावी म्हणून त्यांची विभागणी पन्नास गणांमध्ये केलेली आहे. त्या-त्या ऋषींच्या नावांना गोत्र असे म्हणतात.

## प्रमुख गोत्र व त्यांची प्रवरे

१ **अत्रि**...............आत्रेय -आर्चासन -श्यावाश्व
२ **अघमर्षण**..........वैश्वामित्र -अघमर्षण-कौशिक
३ **अंगिरस**............अंगिरस -अंबरीष -यौवनाश्व
४ **आयास्य**............अंगिरस -आयास्य -गौतम
५ **आर्ष्टिषेण**..........भार्गव - च्यवन -आप्नवन - ..............................आर्ष्टिषेण -अनुप
६ **उपमन्यु**............वासिष्ठ -इंद्रप्रमद -आभ्रद्वसु
७ **कण्व**...............अंगिरस -आजमीढ -कण्व
८ **कपि**...........अंगिरस -आमहीयव -औरुक्षयस
९ **कश्यप**.....कश्यप-अवत्सार -नैधृव (कश्यप)- ..........................अवत्सार -असित
१० **कुत्स**..................अंगिरस -माधांत्र -कौत्स
११ **कौंडिण्य**...........वासिष्ठ -मैत्रावरुण -कौंडिण्य
१२ **कौशिक**..........वैश्वामित्र -अघमर्षण -कौशिक
१३ **गार्ग्य**.......................अंगिरस -शैन्य -गार्ग्य
१४ **जामदग्न्य**..........भार्गव - च्यवन -आप्नवन - ..............................और्व -जामदग्न्य
१५ **नित्युन्द**.........अंगिरस - पौरुकुत्स्य -त्रासदस्यु
१६ **नैध्रुव**...............काश्यप -अवत्सार - नैध्रुव
१७ **पाराशर**................वासिष्ठ -शाक्त्य -पाराशर
१८ **बादराण**.........अंगिरस -पौरुकुत्स्य -त्रासदस्यु
१९ **बाभ्रव्य**..............वैश्वामित्र -देवरात -औदास
२० **बिद**.................भार्गव - च्यवन - आप्नवन ..............................- और्व - बिद
२१ **भारद्वाज**...........अंगिरस बार्हस्पत्य -भारद्वाज
२२ **मित्रायु**................भार्गव - च्यवन -देवोदास
२३ **मुद्गल**..........अंगिरस -भार्म्याश्व -मौद्गल्य
२४ **यस्क**....................भार्गव वैतहव्य -सावेतस
२५ **रथीतर**......................अंगिरस -वैरुप -रथीतर
२६ **वत्स**...............भार्गव - च्यवन -आप्नवन- ..............................और्व -जामदग्न्य
२७ **वासिष्ठ**...............वासिष्ठ -इंद्रप्रमद -आभ्रद्वसु
२८ **विष्णुवृद्ध**.........अंगिरस -पौरुकुत्स्य -त्रासदस्यु
२९ **वैश्वामित्र**.........वैश्वामित्र -अघमर्षण -कौशिक
३० **शांडिल्य**..............शांडिल्य -असित -देवल
३१ **शालाक्ष**........वैश्वामित्र -शालंकालय -कौशिक
३२ **शौनक**...............भार्गव -शौनहोत्र -गार्स्तमद

## प्रवर म्हणजे काय?

गोत्रांची संख्या अगणित असली, तरी धर्माने त्यांची व्यवस्था सुलभ व्हावी म्हणून त्यांची विभागणी पन्नास गणांमध्ये केलेली आहे. प्रत्येक गोत्रांला प्रर्वतक ऋषी असतात. काही गोत्रांना एक, काही गोत्रांना दोन, काही गोत्रांना तीन ते पाचपर्यंत प्रवर्तक असतात. या प्रवर्तक ऋषी- गणांना प्रवर असे म्हणतात.

काही समाजांमध्ये आजही सप्रवर विवाह वर्ज्य केला जातो. तसेच उपनयन प्रसंगी बटूस गोत्र प्रवर, स्वतःची वेदशाखा, सूत्र, स्वतःचे नक्षत्र व चरण नाम ह्यांची माहिती करून दिली जाते.

जेनेटिक्सचा अभ्यास करणाऱ्यांनी हे मान्य केलेले आहे की, एका गोत्रात लग्न केल्यामुळे अनेक आजार (जेनेटिकली ट्रान्समिटेड डिसीज) होऊ शकतात आणि आपल्या पूर्वजांनी जे नियम घालून दिले आहेत. ते योग्य आहेत. ह्यातील बऱ्याच गोष्टींची उकल जेनेटिक्सवाले आता करीत आहे.

आपले पूर्वज आणि आपली हिंदू संस्कृती किती संपन्न होती, ह्याचे हे छान उदाहरण आहे.

**- श्री. राजाभाऊ पाध्ये गुरुजी**

# आजीचे नातीला पत्ररूपाने शुभाशीर्वाद!

सौ. विजया श्रीराम आंबर्डेकर यांनी त्यांच्या नातीला- चि. ईशिताला पत्ररूपाने शुभाशीर्वादच नव्हेत, तर अमेरिकेसारख्या मोठ्या देशात उच्च शिक्षणासाठी एकट्याने जात असताना कशा प्रकारची काळजी घ्यावयाची, आपले आरोग्य कसे सांभाळावयाचे, आपला अभ्यास कसा करावयाचा आणि आपणच आपले संरक्षण कशा प्रकारे करावयाचे याचे उत्तम मार्गदर्शन केले आहे.

सर्वच आई-वडील, आजी-आजोबा आपल्या मुलांची व नातवंडांची नेहमीच काळजी करीत असतात. त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन कसे करावयाचे याची माहिती सर्वांना व्हावी, या एकाच उद्देशाने हे आशीर्वाद व शुभेच्छा पत्र खाली देत आहे.

ईशिता जन्मल्यापासून इंग्रजी माध्यमातच शिकली असल्यामुळे तिच्या आजीने हे पत्र मुद्दामहून इंग्रजीमध्येच लिहिले आहे. पत्राची इंग्रजी भाषा अतिशय सोपी असल्यामुळे ज्यांना इंग्रजीची तोंडओळख आहे असे आई-वडील, आजी-आजोबा व सर्वसामान्य लोकांनाही हे पत्र निश्चितच वाचता येईल आणि त्या पत्रातील भावना समजतील अशी खात्री असल्यामुळे कोणताही फेरबदल न करता हे पत्र मी खास आपल्या वाचकांसाठी देत आहे.

आपणही आपल्या नातवंडाची अशीच काळजी घेत असाल, अशी खात्री आहे.

Good wishes to Granddaughter Ishita from Grandmother Sau. Vijutai Ambardekar.

My Dearest Ishita,

I waited since last fortnight for you to come to Yashraj to meet me leisurely to have a long chat with you. But with your commitments and parties in your friend circles, you could not find time. Hence this effort of meeting you through this letter. Read it, think it over and remember all of us.

I do understand, you were very busy earlier in admission process in different universities abroad and completing all formalities for it. You had to manage your studies also side by side. But then after fixing your destination at Kelley College of Business management (Bloomington) in Indiana, U. S. A. you are free to some extent. Now again you are busy with your packing and shopping.

Ishi, it is really a happy moment for all of us that our little angel Ishi is flying abroad for higher studies. Now listen to what I say : Here you were a free bird enjoying your life in the protected atmosphere under the warm wings of your parents (Sameer & Sonali), but now you are leaving this atmosphere and spreading your own wings to fly high in the sky in U. S. A. So, now responsibility of managing and developing your own personality is on your shoulder. So here are few tips for my sweet heart.

Everyday will be a new lesson for you with different people in new atmosphere. So be cautious and attentive always. Try to judge every person (may be a girl or boy) by their behaviour, talks and looks to understand whether this person is trustworthy for making friendship. Do not allow anyone to come in vicinity of their choice. Try to remain in groups always. You have to protect yourself, maintaining your high dignity and self respect. Have focus on your studies to achieve your high goals.

Ishi, you are, as it is, a good looking innocent girl with soft and sweet tongue, but remember, people around you do not know that you are a mild person, create an impression and be strong firm, decessive in every respect. None should dare to take advantage of your good qualities thinking that you are easily accessible.

One more thing I want to highlight is that your HEALTH IS YOUR WEALTH. Take good care of your health by moderate exercise, swimming, walking and avoid late night sleeps. Take good care of your belongings, including yourself.

You are the treasure of our family and heart and soul of your lovely parents. I am sure, you are capable of handling the situation. Try to maintain discipline in your day to day life. Forget late night parties, you were enjoying in mumbai. Concentrate on your studies and be capable to adjust independent life style in hostel.

Ishi, you are lucky to get such a golden opportunity. It is due to your capabilities, the gods grace, kindness of your parents and blessings of all of us. Grab this opportunity in true sense for making you a strong, independent, adorable and a respectable girl of our family. Make yourself and everyone proud towards your achievements. I know you are quite capable for the same. Your conscious and inherent qualities will always guide you to follow the right path.

We look forward to your graduation in the Business Management and wish you best of luck for your future career. With abundant blessings and lots of love from your grandparents and parents.

With warm Love

Viju Aaji and Baba

**– हणमंत शंकर रायकर**

मुंबई-राजापूर ९८२१२ १६६६४

# कृतज्ञतेचा निर्देशांक

असंच एकदा एक मासिक चाळताना त्यातील एका लेखामधील एका वाक्याने मला विचारमग्न केलं. 'आयुष्यातली सकारात्मकता' याविषयावरचा तो लेख होता. मूळच्या इंग्रजीमधील लेखामधील ते वाक्य असं होतं; Sometimes, try calculating your gratitude index in life, you will realize how lucky you are! (कधीतरी तुमच्या आयुष्यातील कृतज्ञता निर्देशांक मोजण्याचा प्रयत्न करा आणि तुम्हाला लक्षात येईल की तुम्ही किती नशीबवान आहेत ते!) मला **'कृतज्ञतेचा निर्देशांक' ही कल्पनाच भन्नाट आवडली.** जसं स्टॉकमार्केट मध्ये स्टॉक इंडेक्स किंवा ट्रेडिंग इंडेक्स असतात आणि त्यांच्या मूल्यावरून बाजाराची तब्येत ठरवली जाते, तसाच कृतज्ञता भावनेचे चढउतार मोजणारा हा कृतज्ञता निर्देशांक आपल्या मानसिकतेची तब्येत ठरवू शकेल असं मनात आलं. लगेच माझ्या डोक्यात विचारचक्र सुरू झालं की माझ्या आयुष्यातल्या कृतज्ञता कशा मोजायच्या? कृतज्ञता निर्देशांक कसा ठरवायचा? आणि तो दैनंदिन जीवनात कसा आणायचा? अधिक विचार केल्यावर मला काही कल्पना सुचल्या त्या अशा;

१. माझ्या निसर्गदत्त संपदांबद्दल कृतज्ञता मानणे : म्हणजे धडधाकट शरीर मिळालं, धडधाकट अवयव मिळाले, विचारी संवेदनशील मन मिळालं, या बद्दल कृतज्ञता बाळगणे. मला लक्षात आलं की धडधाकट शरीर असणं, कार्यक्षम अवयव असणं हे आपण गृहीत धरतो, पण कार्यक्षम डोळ्यांची किंमत नेत्रविहीन व्यक्तींना विचारात घेतलं तर कळेल, धडधाकट हातपायांची किंमत अपंगांना विचारात घेतलं तर कळेल. संवेदनशील विचारी मनाची किंमत मनोरुग्णांची परिस्थिती पाहून कळेल. आणि एकदा हा मुद्दा लक्षात आला की निरोगी, सुदृढ शरीराबद्दल आपोआप कृतज्ञता मनात दाटून येईल.

२. मला मिळालेल्या नात्यांच्या बाबतीत कृतज्ञता मानणे : आपल्याला लाभलेले माता, पिता, बहीण, भाऊ, काका, मामा, आत्या, मावशी आपल विस्तारित कुटुंब यांच्याबद्दल कृतज्ञता

With best compliments from...



MUKESH V. JOSHI

INSURANCE & INVESTMENT ADVISOR

CONTACT FOR

Life Insurance
Pension Planning
Mediclaim
Fire Insurance
Mutual Fund
Fixed Deposits

ADDRESS

"Shri Neelkamal" Anandpura, Nr. Govt. Press, Kothi Road, Vadodara-390 001

Ph.: 0265-2412812 Mobile : 098250 25006

## वर पाहिजे

वधू : कोकणस्थ ब्राह्मण, एकुलती एक

वय : २९,

उंची : ५ फूट १० इंच

गोरी, प्रेमळ, गृहकृत्यदक्ष, मनमिळाऊ. सध्या पुणे (खराडी) येथे नोकरी करते.

M.Com./M.B.A. फायनान्स झाली आहे.

* वराबद्दल अपेक्षा *

मुलगा निर्व्यसनी, उच्चशिक्षित, उंच, शक्यतो पुण्यात राहणारा व नोकरी करणारा, कऱ्हाडे किंवा कोकणस्थ चालेल. मुलाच्या घरातील वातावरण खेळीमेळीचे असावे. एकत्र कुटुंब चालेल. लग्नानंतर मुलगी नोकरी करणार आहे.

संपर्क

सौ. साठे

फोन : ०२०-२४४६१६६४ (घर)

मो. ९४२०४ ३५८२४

बाळगणे. ही नाती जन्म झाल्यावर आपल्याला सहज मिळतात म्हणून, खूप वेळा किंमत नसते आपल्याला. छोट्या-छोट्या कारणांनी रुसवे फुगवे धरतो आपण. पण या नात्यांची किंमत अनाथाश्रमात वाढणाऱ्या मुलांना पाहून कळेल. त्यांच्या डोळ्यांत मायेच्या एका स्पर्शासाठी आसुसलेली व्यथा दिसली की लक्षात येतं की सकाळी उठल्यावर देवाला नमस्कार करून झाल्यावर नमस्कार करण्यासाठी आईवडील असणं हे किती भाग्याचं लक्षण आहे ते. भांडायला, खेळायला, एकत्र वाढायला भावंडं असणं, हट्ट पुरवायला, लाड करायला मामा, काका, मावशी, आत्या असणं याची जाणीवपूर्वक कृतज्ञता बाळगणं इतक्या महत्त्वाची नाती खचितच आहेत ही.

३. मला मिळालेल्या साधन-संपदेबाबत कृतज्ञता मानणे : म्हणजे राहायला घर असणं, घरात सुखसोई असणं, निजायला अंथरून असणे, पांघरायला पांघरून असणे, घालायला कपडे असणे, अभ्यासाला पुस्तक वह्या मिळणे, चांगल्या शाळेत शिक्षण मिळणे, चवीपरीने खायला मिळणे. जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी अर्थार्जनाची प्रतिष्ठित सोय असणे अशा एक नाही अनेक गोष्टीं कृतज्ञता बाळगण्यासारख्या नाहीत का? चहा थोडा गार झाला तर चिडतो मी. पण वनवासी पाड्यावर गेलं की लक्षात येतं की मुळात जगण्याची धडपड म्हणजे काय असते. दोन वेळच्या भरपेट जेवणाची किंमत काय? थंडी-वाऱ्यापासून संरक्षण मिळण्यासाठी गरम कपडे सोडाच पण किमान कपडे असणं याची किंमत किती? या साऱ्या गोष्टी मला सहज मिळाल्या आहेत तर मी याबाबत कृतज्ञता नको का बाळगायला?

४. माझ्या आयुष्यात आलेल्या इतर माणसांविषयी कृतज्ञता मानणे : मला तळमळीने शिकवणारे शिक्षक, मार्गदर्शक, शेजारी पाजारी, आपले फॅमिली डॉक्टर, ड्रायव्हर, कामवाली मावशी, कचरा घेऊन जाणारी बाई, बिल्डिंगचा वॉचमन अशा एक नाही अनेक व्यक्तींबद्दल जाणीवपूर्वक कृतज्ञता बाळगणे महत्त्वाचं नाही का?

विचार करू लागलो आणि ही यादी लांबच लांब होऊ लागली. यातून एक जाणवलं की ज्या ज्या गोष्टींमुळे माझं जीवन सुसह्य झालं आहे, सुरळीत झालं आहे, सुखावह झालं आहे त्या त्या प्रत्येक वस्तू, व्यक्ती, परिस्थितीबद्दल मनात दररोज जो कृतज्ञताभाव निर्माण होईल आणि त्यावरून त्यादिवशीचा कृतज्ञता निर्देशांक ठरवायचा.

**– श्री. अरुण करंबेळकर**

## 'ज्यूस' के फायदे

१. **नीम ज्यूस** – डायबिटिस, बुखार, त्वचा रोग व खून को शुद्ध बनाता है।

२. **करेला ज्यूस** – शुगर की बिमारी में, ज्वर, लाल तथा चमडी के अन्य दाग को मिटाता है।

३. **तुलसी-पुदिना ज्यूस** – हृदय के लिये बहुत अच्छा असरकारक है। दमा-खासी (सूखी) कफ, वात आदी को तुरन्त ठीक करता है।

४. **धनीया (हरा), अद्रक, निम्बू, जीरा ज्यूस** – पाचन शक्ती, गैस, गले व सर्दी के संक्रमण, जोडो के दर्द, गठीया (संधिवात), शरीर की जकडन आदी से मुक्ती दिलाता है।

५. **आँवला ज्यूस** – नेत्र (आँख) के लिये अतिउत्तम है। भूख बढाता है, ॲसिडिटी को कम करता है। स्त्री रोगों में उद्देशीय सार्थक है। बालों के लिये उत्तम है।

६. **कोकम ज्यूस** – (काला आमचूर) गर्मी की बिमारीयों में लाभकारी है। पित्त-रक्त, कृमी आदी तकलीफों में अत्यंत लाभकारी है।

७. **गाजर ज्यूस** – आँखों के लिये तथा एनिमिक कंडिशन के लिये निम्बू का रस मिलाकर लेने से लाभ होता है।

८. **जामुन का ज्यूस** – शरीर के लिये पाचक, आँखों की जलन, पैरो की जलन, त्वचा रोग, शुगर की बिमारी में लाभकारी है।

९. **बीट ज्यूस (चुकंदर)** – खून की कमी और खून से संबंधित सभी रोगों में लाभकारी है।

१०. **खीरे की काकडी ज्यूस** – इसका ज्यूस शरीर में गर्मी को ठंडक पहुँचाता है। तथा शक्ती वर्धक है।


**– श्रीकृष्ण आंबेकर, बडोदा**


WWW.2FACTOR.IN
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12%
of facebook posts are read
29%
of tweets are read
31%
of emails are opened
98%
of text messages are read
CHECKED
150
TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75%
of people prefer receiving marketing messages via SMS
15%
prefer receiving email ads
10%
prefer in-app or push ads
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
Solv Technologies
www.2Factor.in
95-5459-5459

# कै. शरदराव तळवलकर, एक सन्माननीय व्यक्तिमत्व

सध्या, कै. श्री. शरद तळवलकर, सुप्रसिद्ध अभिनेते यांचे जन्म-शताब्दी वर्ष आहे. मला या महान विनोदमहर्षी, अवलीयाशी संपर्क करून त्यांना उज्जैन येथे एका कार्यक्रमासाठी आणण्याचे परमभाग्य मिळाले. त्यावेळी म्हणजे सन १९८२-८३ मध्ये मी महाराष्ट्र समाज उज्जैयनीचा सचिव होतो आणि त्यांना उज्जैयनीला कार्यक्रम करण्यासाठी बोलावण्याचे ठरले. मी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. कारण त्यामुळे मला त्यांचेशी गप्पा मारण्याची संधी मिळणार होती.

मी पुण्यात आलो. टिळक रोडवरील त्यांच्या घरी थेट आधी न कळविता परस्पर गेलो. खर सांगायचं तर मला ते भेटतील याची खात्री नव्हती पण मी तसाच गेलो. त्यांनीच दार उघडले. 'कोण रे तू?' असे माझे स्वागत झाले. पण त्यातही मला आनंद वाटला. 'कोण रे तू' हा एकवचनी प्रश्नच त्यांच्या स्वभावातील आत्मियतेचे दर्शन देऊन गेला. 'मी गणेश गुर्जर, महाराष्ट्रात बँकेत उज्जैन येथे शाखा प्रबंधक असून महाराष्ट्र समाज उज्जैयनीचा सध्या सचिव आहे.' अशी ओळख दिल्यानंतर 'अरे व्वा तिथेही एवढी महाराष्ट्रीयन लोकसंख्या आहे?' मी सांगितले की, 'साधारणपणे दहा हजार महाराष्ट्रीयन लोकवस्ती आहे. तिथे विविध प्रकारचे कार्यक्रम आम्ही करतो आणि त्याचा आनंद आपले समाजबांधव घेतात.' 'कोणते कार्यक्रम?' त्यांनी विचारले. मी त्यांना सांगितले की, 'दरवर्षी गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करतो. विविध स्पर्धा, विविध गुणदर्शन असे कार्यक्रम करत असतो. तसेच आतापर्यंत अशा उत्सवातून पद्मश्री जितेंद्र अभिषेकी, कथाकथनकार



मा. व. पु. काळे यांचे कार्यक्रमसुद्धा केलेले आहेत. आम्ही तिथे सांस्कृतिक मराठी चित्रपट संस्था काढली आहे आणि वर्षात साधारण बारा मराठी चित्रपटांचे प्रदर्शन करतो.'

मग 'मी काय करावे असे तुला वाटते?' त्यांनी विचारले. आता ताक मागायला जायचे आणि भांडे लपवायचे कशाला? मी त्यांना म्हटले की, 'तुम्ही आपल्या या दूरच्या प्रदेशातील बांधवांना संबोधित करावे अशी इच्छा आहे.' 'कधी?' त्यांनी विचारले, 'अर्थातच गणेशोत्सवात.' मी म्हटले. 'हो आनंदाने येईन, आणखी कुठे कुठे महाराष्ट्र समाज आहे?' मी म्हटले, इंदोर, रतलाम येथे आहे. 'मला तुमची तारीख पक्की करून कळव. मी नक्की येईन. उज्जैन म्हणजे महाकालेश्वर, त्याचेही दर्शन होईल.' मी म्हटले, 'अवश्य करू या' आणि मी आनंदाने परत निघालो आणि उज्जयिनीला आलो.

सर्वजणांना मी हा सर्व वृत्तांत सांगितला आणि त्यांनाही खूप आनंद झाला. आम्ही गणेशोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये मोठ्या अक्षरात विनोदमहर्षी श्री. शरद तळवलकर यांचा उल्लेख केला.

ठरल्यानुसार मा. शरदजी तळवलकर आले आणि हॉल तुडुंब भरला होता. आपल्या विनोदी शैलीत त्यांनी विविध प्रसंग वर्णन केले. ते ही त्यांच्या लकबीसह. उज्जैयनीचे सभासद खूप खूप आनंदून गेले. हा अवलीया खरोखरच महान होता आणि सध्याच्या भाषेत बोलायचे झाले तर अगदी 'ड्रुम ैं एरींह'

मला अजूनही तो प्रसंग डोळ्यासमोर येतो. असे हे महान अभिनेते मा. कै. शरदजी तळवलकर.

**– गणेश गुर्जर, पुणे**

मो. ९८९०९ ९०११३

**शुभ दीपावली**

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

WE LOVE
WHAT WE DO.

VJ | VILAS JAVDEKAR
DEVELOPERS

www.javdekars.com

Corporate Office: 306, Siddharth Towers, Sangam Press Road,
Kothrud, Pune 411038. | T: +91-20-6764 8000

BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषकः

संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,

'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,

पुणे- ४११ ०३० फोन : ०२० २४४३ २४४३.

To,